रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १२१
www.ramprahar.com

शनिवार, १८ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## डीपफेक असंतोष पसरवणारे मोठे संकट -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली** : बॉलीवूडच्या अभिनेत्री डीपफेक तंत्रज्ञानाला बळी पडल्या आहेत. या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून अनेक अभिनेत्रींचे अश्लील फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्यात आले आहेत. या प्रकरणाची केंद्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. आता खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यावर भाष्य केले आहे. ते भाजपच्या दिल्लीतील मुख्यालयात दिवाळी मिलन कार्यक्रमात पत्रकारांशी बोलत होते. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात ज्या प्रकारे डीपफेक पसरत आहेत ते एक मोठे संकट आहे. विशेष म्हणजे यामुळे समाजात असंतोष चटकन पसरतो. डीपफेक म्हणजे काय, ते किती मोठे संकट आणू शकते आणि त्याचे काय परिणाम होऊ शकतात याबद्दल आपण आपल्या कार्यक्रमांतून लोकांना शिक्षित केले पाहिजे, असे आवाहनही पंतप्रधानांनी या वेळी माध्यमांना केले.

### अंतरंग

नेव्हीच्या कर्मचाऱ्याला ५७ लाखांचा ऑनलाईन गंडा/३
आजपासून आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव/६
मिस्टर वर्ल्ड बॉडी बिल्डिंगमध्ये सुभाष पुजारी यांना ‘सुवर्ण’/८

# मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही, पण तुम्ही वेगळे आरक्षण घ्या

## ओबीसी आरक्षण बचाव एल्गार सभेत मंत्री छगन भुजबळ यांचे प्रतिपादन

**जालना : प्रतिनिधी**

आमचा मराठा आरक्षणाला विरोध नाही, पण आमचीसुद्धा लेकरे आहेत. त्यामुळे तुम्ही वेगळे आरक्षण घ्या, असे प्रतिपादन ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी (दि. १७) जालन्यातील अंबड येथे केले. ते ओबीसी आरक्षण बचाव एल्गार सभेत बोलत होते.




या सभेला विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार, ओबीसी नेते प्रकाश शेंडगे, बबन तायवाडे, लक्ष्मण गायकवाड, रासप प्रमुख महादेव जानकर, आमदार गोपीचंद पडळकर, राजेश राठोड, माजी आमदार आशिष देशमुख आदी नेते आणि बहुसंख्येने ओबीसी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाची शिफारस केली होती. बी.डी. देशमुख यांच्या समितीमुळे ओबीसी समजाला आरक्षण मिळाले. ओबीसीत मार्च १९९४मध्ये २०१ जातींचा समावेश करून जीआर काढला. सुप्रीम कोर्टाच्या शिक्क्याने हे आरक्षण मिळाले, असे सांगून मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, आरक्षण हा गरीबी हटावचा उपक्रम नाही. ओबीसींची गरीबी अजूनही दूर झाली नाही. वर्षानुर्षे जे दबलेले आहेत त्यांना वर आणण्यासाठीचा हा कार्यक्रम आहे.

जालन्यात झालेला पोलिसांचा लाठीचार्ज सर्वांनी पाहिला, पण ७० पोलीस हॉस्पिटलमध्ये दाखल झाले, त्यांनी दगडाचा मार खाल्ला. ते काय पाय घसरून पडले का, असा सवाल करून जालन्यात लाठीचार्ज झाल्यानंतर राजेश टोपे आणि रोहित पवार हे घरी झोपलेल्या शूर सरदाराला घेऊन आले आणि तिकडे बसवले. म्हणाले शरद पवारसाहेब येणार आहेत. शरद पवार हे उत्कृष्ट प्रशासक आहेत असे मी आजही समजतो. त्यांना जर दाखवले असते इथे वेगळे प्रकार झाले आहेत तर जे झाले ते झाले नसते. राज्यासमोर खरे चित्र आले नाही, उलट पोलिसांचे निलंबन झाले, असे मंत्री भुजबळ म्हणाले.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी, पद महत्त्वाचे नाही, तर समाज महत्त्वाचा आहे, असे असे सांगितले. इतर वक्त्यांचीही समयोचित भाषणे झाली.

# राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी पनवेलमध्ये रंगणार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार असून यंदाच्या जीवन गौरव पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १७) येथे पत्रकार परिषदेत दिली.



### ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धेचे दहावे वर्ष असून त्या संदर्भात विस्तृत माहिती देण्यासाठी खांदा कॉलनी येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेस अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, कोषाध्यक्ष अमोल खेर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सांस्कृतिक समन्वयक गणेश जगताप, सदस्य चिन्मय समेळ उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे माहिती देताना सांगितले की, पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ८ ते १० डिसेंबरपर्यंत या स्पर्धेची अंतिम फेरी होणार आहे. तत्पूर्वी नागपूर, जळगाव, नाशिक, कोल्हापूर, रत्नागिरी, सातारा व पुणे केंद्रांची प्राथमिक फेरी पार पडली असून १८ व १९ नोव्हेंबरला रायगड केंद्राची, तर २४ ते २७ नोव्हेंबरपर्यंत मुंबई, ठाणे, कल्याण व इतर केंद्रांची प्राथमिक फेरी होणार आहे. अंतिम फेरीचे उद्घाटन ८ डिसेंबर रोजी, तर पारितोषिक वितरण सोहळा १० डिसेंबरला मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. (पान २ वर..)

## शांततेच्या मार्गाने आमचा लढा सुरूच राहील : मनोज जरांगे-पाटील



**सांगली : प्रतिनिधी**

टीका करणाऱ्या लोकांना प्रत्युत्तर द्यायचे नाही, असे आम्ही ठरवले असून केवळ आरक्षणाचे ध्येय समोर ठेवून आमचा लढा शांततेच्या मार्गाने सुरूच राहील, असे जरांगे-पाटील यांनी म्हटले आहे. ते शुक्रवारी (दि. १७) सांगलीतील सभेत बोलत होते.

मराठ्यांना आरक्षण मिळाल्याशिवाय एक इंचही मागे हटणार नाही असे सांगून आपल्याला एकजुटीशिवाय पर्याय नाही. त्यामुळे गटतट बाजूला ठेवून एकत्र येत एकजूट दाखवून द्या, असे आवाहन या वेळी जरांगे-पाटील यांनी केले.

## राज्य मागासवर्ग आयोगाची आज बैठक

**पुणे** : मराठा आरक्षण मागणीच्या पार्श्वभूमीवर राज्य मागासवर्ग आयोगाची शनिवारी (दि. १८) पुण्यात तातडीची बैठक बोलवण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मागासवर्ग आयोगाला तसे पत्र दिले आहे. या बैठकीला राज्य मागासवर्ग आयोग अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांच्यासहित १० सदस्य उपस्थित राहणार आहेत. या वेळी मागासवर्गीय आयोग कार्यपद्धती ठरवणार आहे.

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने अवधी मागितला होता. त्यानुसार आता सरकार दरबारी हालचालींना वेग आला आहे. मराठा समाजाच्या मागासवर्गीय चाचपणीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मागासवर्गीय आयोगाला निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुण्यात सकाळी ११ वाजता ही बैठक होणार आहे. या बैठकीत पुढील कार्यपद्धती काय असावी यावरदेखील चर्चा होणार आहे.

## जरांगे-पाटील यांच्या खोपोलीतील सभास्थळाची अधिकाऱ्यांकडून पाहणी



**खालापूर** : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांची २० नोव्हेंबर रोजी खोपोलीतील लौजी परिसरातील डिपी रोडला असणाऱ्या आरक्षित मैदानावर दुपारी ३ वाजता सभा होणार आहे. या सभेच्या ठिकाणाची व परिसराची शासकीय अधिकाऱ्यांनी पाहणी करून आढावा घेतला.

या वेळी उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार आयुब तांबोळी, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत कदम, खोपोलीचे पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत, आयोजक सुनील पाटील व मराठा आरक्षण संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### निवडक

#### जम्मू काश्मिरमध्ये चकमकीत पाच दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर** : जम्मू काश्मिरमधील कुलगाम जिल्ह्यात भारतीय सुरक्षा दलाने लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेच्या पाच दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही कारवाई आता शेवटच्या टप्प्यात असून या संपूर्ण भागात शोधमोहीम राबवण्यात आली आहे.

#### काशिद येथील समुद्रात पुण्याचा पर्यटक बुडाला

**मुरूड** : काशिद समुद्र किनारी आलेल्या पुण्याच्या ग्रुपमधील जुनेद अतिक शेख (वय २१, रा. हडपसर हांदेवडी, पुणे) हा तरुण शुक्रवारी (दि. १७) पाण्यात बुडाला. पोहता पोहता हा खोल पाण्यात गेल्याने त्याचा थांगपत्ता लागला नाही. स्थानिकांच्या मदतीने सायंकाळी उशिरापर्यंत त्याचा शोध सुरू होता. मात्र जुनेद सापडला नाही, अशी माहिती मुरूड पोलिसांनी दिली.

## न्हावे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजप युतीचे राजेश म्हात्रे यांची निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींची निवडणूक नुकतीच झाली. यामध्ये महत्त्वाच्या ग्रामपंचायती आपल्याकडे खेचण्यात भाजपला यश आले. यापैकी न्हावे ग्रामपंचायतीचे भाजप महायुतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांनी शुक्रवारी (दि. १७) पदभार स्वीकारला, तर उपसरपंचपदी भाजप युतीचेच उमेदवार राजेश म्हात्रे निवडून आले आहेत. तत्पूर्वी गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत या संदर्भात बैठक झाली.

शेकाप आणि शिवसेनेला चारीमुंड्या चीत करीत न्हावे आणि न्हावाखाडीच्या मतदारांनी भाजप युतीच्या विजेंद्र पाटील या तरुण सरपंचाला संधी दिली. मतदारांनी सरपंचासह भाजप युतीच्या आठ सदस्यांना भरघोस मतांनी निवडून दिले. दरम्यान, शुक्रवारी उपसरपंचाची निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजप युतीचे उमेदवार राजेश म्हात्रे यांना नऊ मते पडली आणि त्यांनी शेकाप-शिवसेना आघाडीच्या उमेदवाराला पुन्हा एकदा पराभवाची धूळ चारली.

या पार्श्वभूमीवर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत गुरुवारी बैठक झाली होती. या वेळी सरपंच विजेंद्र पाटील, सदस्य सागरशेठ ठाकूर, नरेश मोकल, शैलेश पाटील, राजेंद्र म्हात्रे, रंजना पाटील, ललिता ठाकूर, सुनिता भोईर, जागृती म्हात्रे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या बैठकीस भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कान्हाशेठ ठाकूर, निवडणूक प्रभारी निलेश पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, (पान २ वर..)

# नवी मुंबईत पहिली मेट्रो धावली!

## सेंट्रल पार्क नावामध्ये मुर्बी गावाचा उल्लेख असलेला फलक ग्रामस्थांनी लावला






**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईकरांना प्रतीक्षा असलेली मेट्रोसेवा अखेर सुरू झाली आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून कोणत्याही प्रकारचे उद्घाटन न करता येथील मेट्रोसेवा सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार शुक्रवारी (दि. १७) बेलापूर ते पेंधर स्थानकादरम्यान पहिली मेट्रो धावली. या वेळी सिडकोचे जॉईंट एमडी कैलाश शिंदे, नवी मुंबई महापालिकेच आयुक्त राजेश नार्वेकर उपस्थित होते.

दरम्यान, बेलापूर ते पेंधर मेट्रो मार्गावरील सेंट्रल पार्क स्थानक या नावामध्ये मुर्बी गावाचा उल्लेख असलेला फलक ग्रामस्थांनी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत शुक्रवारीच या स्टेशनपाशी लावला.

या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, युवा अध्यक्ष नितेश पाटील, गाव अध्यक्ष जगदीश ठाकूर आणि ग्रामस्थ उपस्थित होते. गावाच्या नावासंदर्भात सिडकोने एक आठवड्यात कार्यवाही करावी; अन्यथा जुन्या फलकाला काळे फासू, असा इशारा या वेळी ग्रामस्थांनी दिला.




# पीक विमा योजनेतील अग्रीम रकमेचे वाटप सुरू

## आतापर्यंत ९६५ कोटी रुपये शेतकऱ्यांना वाटप

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील विम्याच्या अग्रीम रकमचे वाटप वेगाने सुरू आहे. आतापर्यंत ४७ लाख ६३ हजार नुकसानभरपाई अर्जांना मंजुरी मिळाली असून एक हजार ९५४ कोटी रुपये वाटप होणार आहेत. यापैकी ९६५ कोटी रक्कम वाटण्यात आली असून उर्वरित रक्कम वाटण्याचे काम प्रगतिपथावर आहे, अशी माहिती शुक्रवारी (दि. १७) राज्य मंत्रिमंडळ बैठकीत कृषी विभागाच्या सादरीकरणात देण्यात आली.

खरीप हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसानीसंदर्भात एकंदरीत २४ जिल्ह्यांसाठी अधिसूचना काढण्यात आली होती. आता १२ जिल्ह्यांमध्ये या अधिसूचनेवर विमा कंपन्यांचे कोणतेही आक्षेप नसून नऊ जिल्ह्यांमध्ये अंशत: आक्षेप आहेत. राज्य स्तरावर सध्या बीड, बुलढाणा, वाशिम, नंदूरबार, धुळे, नाशिक,



अहमदनगर, पुणे, अमरावती अशा नऊ जिल्ह्यांमध्ये विमा कंपन्यांच्या आक्षेपावर अपील सुनावणी सुरू असून पुणे आणि अमरावती वगळता इतर ठिकाणची सुनावणी संपली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत एक कोटी ७० लाख ६७ हजार अर्जदारांनी नोंदणी केली असून केवळ एक रुपयात राज्य शासनाने शेतकऱ्यांना पीक विमा दिला आहे. यासाठी एकूण आठ हजार १६ कोटी रुपये विमा हप्ता द्यावा लागणार असून तीन हजार ५० कोटी १९ लाख रुपये असा पहिला हप्ता देण्यात आला आहे.

### पर्जन्यमान आणि पीक पेरणी

***राज्यात ३१ ऑक्टोबर अखेरपर्यंत सरासरीच्या ८६ टक्के पाऊस (९२८.८ मिमी) झाला आहे. रब्बीसाठी ५८ लाख ७६ हजार हेक्टर पेरणीचे नियोजन असून आतापर्यंत २८ टक्के पेरणी झाली आहे. सध्या जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पेरणी मंदावली आहे. गतवर्षी याच सुमारास १३ लाख ५० हेक्टर पेरणी झाली होती. यंदा १५ लाख ११ हेक्टर पेरणी झाली आहे. रब्बी हंगामात ज्वारी हे महत्त्वाचे पीक असून १७ लाख ५३ हजार हेक्टर क्षेत्र आहे. सध्या सरासरीच्या ४५ टक्के ज्वारीची पेरणी झाली आहे. हरभऱ्याचे क्षेत्र २१.५२ लाख हेक्टर असून या वर्षी ५.६४ लाख हेक्टर म्हणजेच सरासरीच्या २६ टक्के पेरणी झाली आहे, अशी माहिती कृषी विभागाकडून या वेळी देण्यात आली आहे.***

# ग्रामपंचायत इमारतीच्या कामांसाठी निधी वाढविला

## बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजनेलाही मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायत इमारतीच्या कामांसाठी निधी वाढविण्याचा तसेच बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजनेलाही मुदतवाढ देण्याचा निर्णय शुक्रवारी (दि. १७) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. आता ही योजना २०२७-२८ या वर्षापर्यंत राबविण्यात येईल.

स्वतंत्र इमारत नसलेल्या दोन हजारपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १५ लाखऐवजी २० लाख रुपये व दोन हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १८ लाख ऐवजी २५ लाख अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली तसेच यापूर्वी ग्रामपंचायत स्वनिधीची असलेली अटदेखील रद्द करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत बांधकामासाठी यापेक्षा अधिक निधीची आवश्यकता अतिरिक्त निधी केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजना, वित्त आयोग निधी, जिल्हा ग्रामविकास निधी, स्थानिक विकास निधी (खासदार, आमदार निधी) इ. बाबींमधून देण्यात येईल. राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नाही अशा ४२५२ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेस २०१८-१९ ते २०२१-२२ या चार वर्षांसाठी मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार १७४८ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या ग्रामपंचायत इमारतींचे बांधकाम सुरू असून याकरिता आतापर्यंत ३८१३.५० लाख रुपये इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

# वडखळ ग्रामपंचायत उपसरपंचपदी मत्स्यगंधा म्हात्रे



**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील वडखळ ग्रामपंचायत उपसरपंच निवडणूक शुक्रवारी (दि. १७) ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक निरीक्षक सचिन रोकडे, सहाय्यक निवडणूक निरीक्षक वृषाली निंबरे, पंकज डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या वेळी उपसरपंचपदासाठी मत्स्यगंधा म्हात्रे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. सरपंच शिवानी विश्वास म्हात्रे यांनी पदभार स्वीकारला. या वेळी कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

योगेश पाटील म्हणाले की, क्षेत्रेश्वर जनमत विकास आघाडीला जनतेने बहुमताने निवडून दिले असून येत्या काळात वडखळमधील ज्या विकास योजना आहेत त्या कार्यान्वित करू. आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वडखळ ग्रामंपचायतीमध्ये विकासाची गंगा आणून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू तसेच दर गुरुवारी जनता दरबार भरविणार असल्याचे ते म्हणाले.

सरपंच शिवानी म्हात्रे यांनी सांगितले की, एक उच्च शिक्षित महिला सरपंच म्हणून वडखळच्या नागरिकांनी १२००पेक्षा जास्त मताधिक्यानी विजयी झाल्यामुळे माझा गाव, गावांचा विकास ही संकल्पना राबविणार असून सर्व सहकार्यांना एकत्रित घेऊन काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी सदस्य सुनिल जांभळे, नूतन म्हात्रे, मिलिंद मोकल, निलेश म्हात्रे आदींसह सदस्य उपस्थित होते. या वेळी माजी जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, मनोहर म्हात्रे, मळेघर सरपंच शरद पाटील, वडखळ माजी उपसरपंच रवींद्र मोकल, हरिभाऊ म्हात्रे, शहबाज मुजावर यांनी वडखळ सरपंच व उपसरपंच यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबईत प्लास्टिक पिशव्यांचा बेसुमार वापर

## किरकोळ दुकानदार व फेरीवाल्यांसोबतच ग्राहकांवरही कारवाईची गरज

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने स्वच्छता सर्वेक्षणात यंदा प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी कंबर कसली आहे. त्यासाठी विविध उपाय योजना करतानाच उपक्रम आखले जाणार आहेत, मात्र अद्याप शहर विद्रुप करण्यात महत्वाची भूमिका बजावणारा मुख्य घटक असलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांबाबत नवी मुंबई पालिकेला तोडगा काढता आलेला नाही. त्यामुळे किरकोळ दुकानदार व फेरीवाल्यांचे फावले असून खुलेआम प्लॅस्टिक पिशव्या ग्राहकांना दिल्या जात आहेत. त्यामुळे पालिकेकडून दुकानदार व



ग्राहकांवरदेखील कारवाई करण्याची गरज भासू लागली आहे.

नवी मुंबई महापालिकेकडून सध्या स्वच्छ सर्वेक्षणास सुरुवात झाली आहे. स्वच्छतेला बाधा आणणारा प्रमुख घटक प्लास्टिक पिशव्या असून त्यास प्रतिबंध घालताना पालिकेला अपयश येत आहे. त्यामुळे शहर प्लास्टिक वाढीने ग्रासले आहे. पालिकेने प्लॅस्टिक विरोधातील कारवाईत आजतागायत लाखो रुपयांचा दंड वसूल केला आहे. प्लॅस्टिक पिशव्यांसह प्लॅस्टिकच्या बंदी घातलेल्या उत्पादन वापरणाऱ्यांना हा दंड ठोठावण्यात आला होता. शासनाने प्लॅस्टिक बंदीचा आदेश काढल्यावर महाराष्ट्रातील इतर महापालिकांच्या तुलनेत नवी मुंबई महापालिका कारवाई करण्यात अग्रेसर होती.

याबाबत नवी मुंबई महापालिकेचे कौतुक झाले होते. प्लास्टिक कारवाईत सातत्य नसल्याने पलासिक पिशव्या विक्रेत्यांचे फावत असल्याचे दिसून येते.

कारवाईसाठी पालिकेने विभागनिहाय जबाबदाऱ्या दिल्या आहेत. घनकचरा विभागाकडून स्वच्छतेसाठी हरत-हेचे काम केले जात असले तरी, विभाग कार्यालयाकडून मात्र प्लास्टिक पिशव्यांच्या वापराबाबत काहीसे सैल धोरण अवलंबले जात आहे. त्याचा फायदा दुकानदार व किरकोळ विक्रेत्यांकडून घेतला जात असून खुलेआम प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा सर्रास वापर केला जात आहे. त्यामुळे पालिकेने दुकानदार तसेच वस्तू घेणाऱ्या ग्राहकांवर देखील कारवाईचा करणे गरजेचे आहे.

# पुण्यातील वारजे भागात टोळक्याने पेटवली वाहने

**पुणे :** शहरात कोयते उगारून दहशत माजविण्याचे सत्र सुरू असतानाच वारजे भागात टोळक्याने चार वाहने पेटवून दिल्याची घटना घडली. टोळक्याने एका मोटारीची काच फोडली.

या प्रकरणी वारजे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका तरुणाने वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वारजे भागातील रामनगर परिसरात रिक्षा, तसेच तीन दुचाकी लावण्यात आल्या होत्या. मध्यरात्री टोळक्याने तरुणाच्या घरासमोर लावलेल्या तीन दुचाकी, तसेच सचिन तिडके यांची रिक्षा पेटवून दिली. या भागातील रहिवासी प्रवीण घोलप यांच्या मोटारीची काच फोडून टोळके पसार झाले. सहायक पोलीस निरीक्षक बाबर तपास करीत आहेत.

पान १ वरुन

# राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी पनवेलमध्ये रंगणार

या वेळी ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असून त्यांना पुरस्कार जाहीर करताना खूप आनंद होत असल्याची प्रतिक्रिया आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी सांगितले की, या एकांकिका स्पर्धेत राज्यभरातून १००हून अधिक एकांकिकांचा सहभाग असतो. नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला आहे. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढत आहे. सांस्कृतिक कट्टा राज्यभर पसरला असून या क्षेत्रातून कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगतानाच ओमकार भोजने, संदीप रेडकर, अजिंक्य ननावरे हेसुद्धा मेहनत घेऊन अशाच स्पर्धेतून पुढे आल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अंतिम फेरीचे परीक्षण नाट्य-सिने क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्या नजरेतून होत असल्याचेही त्यांनी नमूद केले तसेच स्पर्धेचा ब्रँड अँबेसिडर आणि स्पर्धेचे स्वतःचे शीर्षक गीत असलेली ही महाराष्ट्रातील एकमेव एकांकिका स्पर्धा असून यंदाच्या स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते अजिंक्य ननावरे असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर या स्पर्धेसाठी मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक निल ग्रुप, तर मीडिया प्रायोजक इट्स माजा डॉट कॉम असल्याची माहिती दिली.

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा पुढे चालत राहावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.

***अशी आहेत पारितोषिके***

*प्रथम क्रमांक : एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांक : ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक : २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक : १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह,उत्तेजनार्थ दोन बक्षिसे : प्रत्येकी पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, विनोदी एकांकिका : सात हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह , लक्षवेधी एकांकिका : सात हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह*

***वैयक्तिक पारितोषिके***

*सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री, लेखक, नेपथ्य, प्रकाश योजना, संगीत, प्रथम क्रमांक : दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक : एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक : एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ : ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह*

***उत्कृष्ट वेशभूषा (कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ)*** *: एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्कृष्ट विनोदी कलाकार : एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह उत्कृष्ट बालकलाकार : एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह*

***प्रत्येक केंद्रावरील सर्वोत्कृष्ट एकांकिका***

*प्रथम क्रमांक : सात हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह*
*द्वितीय क्रमांक : पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह*

# न्हावे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजप युतीचे राजेश म्हात्रे यांची निवड



न्हावेचे माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, चंद्रकांत भोईर, सी.एल.ठाकूर, माजी उपसरपंच किसन पाटील, मिनाक्षी पाटील, अरुणशेठ ठाकूर, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, स्वप्नील ठाकूर, आकाश कडू, गणेश पाटील, अमोघ ठाकूर आदी उपस्थित होते.

दरम्यान, उपसरपंचपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया पार पडल्यानंतर भाजप युतीच्या कार्यकर्त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर फटाके फोडून आपला आनंद साजरा केला. या वेळी सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, निवडणूक प्रभारी निलेश पाटील, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, चंद्रकांत भोईर, सी.एल. ठाकूर, किसन पाटील, गणेश पाटील, किशोर पाटील, किशोर घरत, स्वप्नील ठाकूर, नवनाथ म्हात्रे, संदीप म्हात्रे, संदीप पाटील, चंद्रकांत पाटील, राजेश घरत, दीपक भोईर, मीनाक्षी पाटील, शोभा भोईर, अक्षता भोईर, सविता ठाकूर, वैशाली म्हात्रे, धनवंती म्हात्रे, रंजना घरत, सुशीला पाटील, वासंती भोईर, चंद्रलेखा भोईर आदी उपस्थित होते.

# राज्य आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालाचे सादरीकरण

## एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेसाठी ३४१ शिफारशी

**मुंबई : प्रतिनिधी**


राज्य आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालाचे शुक्रवारी (दि. १७) राज्य मंत्रिमंडळात सादरीकरण करण्यात आले. राज्याला एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध ३४१ शिफारशी या परिषदेने केल्या आहेत. हे सादरीकरण मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी केले.

राज्याचा जीडीपी (विकास दर) १७ टक्के साध्य करणे, फॅब आणि इलेक्ट्रीक वाहनांच्या उत्पादनाला गती देऊन १८ टक्के विकास साधणे, कृषी क्षेत्रात १३ टक्के वाढ करणे, राज्यातील सिंचन प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी अधिकचा निधी नाबार्ड तसेच इतरांकडून मिळविणे, ४० टक्क्यांपेक्षा जास्त सिंचन पूर्ण झालेले ७५ प्रकल्प वेगाने पूर्ण करणे, मुंबई आणि एमएमआर परिसरात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा तसेच आर्थिक विकासाचे उपक्रम राबविणे, कौशल्य विकासात २०२८पर्यंत १५ दशलक्ष नोकऱ्या निर्माण करणे तसेच आरोग्य, पर्यटन, ऊर्जा या विभागातदेखील महत्त्वपूर्ण आवश्यक बदल करून या क्षेत्राचा विकास करणे, जिल्ह्यांचा समतोल विकास करणे आणि १५ जिल्ह्यातील २७ तालुक्यांवर विशेष लक्ष देणे, शेतकरी उत्पादक संस्थांना बळकट करणे व शीतगृहांमध्ये वाढ करणे अशा शिफारशी यामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

# मध्य रेल्वेच्या अप्पर महाव्यवस्थापकपदी स्वैन

**रोहे : प्रतिनिधी**

चित्तरंजन स्वैन यांनी मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला आहे. याआधी ते पश्चिम रेल्वेचे प्रधान मुख्य परीचालन व्यवस्थापक होते. आलोक सिंह ३१ ऑक्टोबर रोजी रेल्वे सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर चित्तरंजन स्वैन यांची नियुक्ती झाली आहे.



भारतीय रेल्वे ट्रॅफिक सेवा १९८९च्या बॅचचे अधिकारी चित्तरंजन स्वैन यांना विविध क्षेत्रीय रेल्वेमध्ये विविध क्षमतांमध्ये रेल्वे काम करण्याचा अफाट आणि समृद्ध अनुभव आहे. त्यांनी दक्षिण पूर्व रेल्वेचे विभागीय परिचालन व्यवस्थापक, आद्रा विभाग, खुर्दा रोड येथे वरिष्ठ विभागीय परीचालन व्यवस्थापक, ईस्ट कोस्ट रेल्वे, चरक्रधरपूर विभाग, दक्षिण पूर्व रेल्वे आणि बिलासपूर विभाग, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, उपमुख्य परीचालन व्यवस्थापक (गुड्स), भुवनेश्वर, ईस्ट कोस्ट रेल्वे, मुख्य माल परीचालन व्यवस्थापक, बिलासपूर, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, मुख्य वाहतूक नियोजन व्यवस्थापक, सिकंदराबाद, दक्षिण मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे यांसारख्या विविध पदांवर त्यांनी काम केले आहे. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कर्जतमध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे यांना शिवसेनेकडून अभिवादन



**कर्जत : प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त शुक्रवारी (दि. १७) कर्जत शहराच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

शहरातील बाळासाहेब भवन या आमदार महेंद्र थोरवे यांच्या जनसंपर्क कार्यालयात शहर शिवसेनेच्या वतीने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

या वेळी माजी उपसभापती मनोहर थोरवे, नगरसेवक संकेत भासे, शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, शहर संघटक नदीम खान, उदय शिंदे , किशोर कदम, सचिन भोईर, प्रदीप वायकर, पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



**छत्रपती संभाजीनगर : भाजप युवा मोर्चाची प्रदेश कार्यकारिणी बैठक उत्साहात झाली. या वेळी भाजप युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, प्रदेश प्रभारी विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, दिनेश खानावकर, शुभ पाटील उपस्थित होते.**

**दुखवटा**

# मधुसूदन पाटील

**नागोठणे** : अलिबागजवळील शहाबाज गावाचे निवृत्त उपजिल्हाधिकारी मधुसूदन गोपाळ पाटील यांचे गुरुवारी (दि. १६) रात्री ११ वाजता ठाणे येथील होरायझन हॉस्पिटल येथे वयाच्या ९२व्या वर्षी निधन झाले. मधुसूदन पाटील त्यावेळच्या कुलाबा जिल्ह्यात १९४४ साली मधुसूदन पाटील व्हर्नाक्युलार फायनल परिक्षेत प्रथम क्रमांकाने पास झाले. महसूल खाते, लेखापाल, नायब तहसीलदार म्हणून कुर्ला, तहसीलदार म्हणून सावंतवाडी, सहाय्यक आयुक्त म्हणून ठाणे महानगरपालिका आणि शेवटी उपजिल्हाधिकारी विशेष भूसंपादन अधिकारी ठाणे या पदावर कार्यरत होते.



# पनवेलमध्ये उपसरपंचपदांवरही भाजपचा झेंडा




## नवनिर्वाचित सरपंचांनी स्वीकारला कार्यभार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने आपली ताकद दाखवून अनेक ग्रामपंचायतींवर आपला झेंडा फडकावला. या निवडणुकीत विजयी झालेल्या सरपंचांनी कार्यपदभार तसेच उपसरपंचांची निवड प्रक्रिया शुक्रवारी (दि. १७) झाली. यामध्ये मालडुंगे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी जनार्दन निरगुडा, सोमाटणे ग्रामपंचायतीच्या उपसरंचपदी दिपा पाटील तर भिंगार ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अशोक गायकर यांची बिनविरोध निवड झाली.

त्याबद्दल भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सर्व नवनिर्वाचित उपसरपंच तसेच सरपंच सिताराम चौधरी, तेजस्विनी पाटील आणि सरपंच गुलाब रामदास वाघमारे यांनी आपला पदभार स्विकारल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले, तसेच पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भुपेंद्र पाटील, राजा भोईर, मयुर कदम, मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सिताराम चौधरी, उसरपंच जनार्दन निरगुडा, सदस्य उषा वारगडा, विष्णू पारधी, माई खंडवी, ताई भस्मा, अर्जुन कांबडी, वनिता वाघ, वाजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजेश भोईर, उपसरपंच रेवण पाटील, पदू वाघ, जोमा निरगुडा, विकास भगत, सोमाटणे ग्रामपंचायतीचे सरपंच तेजस्विनी पाटील, उपसरपंच दिपा पाटील, सदस्य रंजनी रामा मुंढे, अविनाश मुंढे, विशाल पाटील, रविंद्र कांबळे, प्रवीण खंडागळे, प्रवीण काळबागे, अविनाश गाताडे, पुंडलिक दिघे, कृष्ण मोरे, यशवंत गायकर, रमेश मुंढे, रामा मुंढे, धनंजय पाटील, जयेंद्र मुंढे, आत्माराम पाटील, चेतन पोपेटा, मारुती पाटील, भिंगार ग्रामपंचायतीचे सरपंच गुलाब रामदास वाघमारे, उपसरपंच अशोक राजाराम गायकर, सदस्य अशोक पाटील, सुभाषजेठू पाटील, सुनील पाटील, करीना पाटील, शामल लहाने, रीया पाटील, अशा वाघमारे, उज्वला वाघमारे, भाजपचे चेतन गायकर, योगेश लहाने, ज्ञानेश्वर पाटील, रामदास खेत्री, रामदास म्हात्रे, रघुनाथ ठाकूर, हरिभाऊ लहाने, रवींद्र शिसवे, महेश लहाने, रविंद्र गायकर, सुनील पाटील, सतीश पाटील, सुभाष पाटील, अशोक लहाने, वैभव राणे, अकाश राणे, नरेश लहाने, संदेश लहाने, अविनाश शिसवे, संजीवन गायकर, प्रतिक खेत्री, प्रकाश खेत्री, प्रवीण शिसवे, चेतन गायकर, ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या वतीने लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम करणाऱ्या कामगारांना अत्यावश्यक साहित्य वाटप शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सीएलसीचे डेप्युटी बाळासाहेब वाघ, सहाय्यक कामगार आयुक्त शितल कुलकर्णी, अदानी कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक दिनेश ओझा, प्रोजेक्ट अकाउटंट पी.व्ही. संतोष, जय भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत व कामगार उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

## नेव्हीच्या कर्मचाऱ्याला ५७ लाखांचा ऑनलाईन गंडा

**पनवेल : वार्ताहर**

ट्रेडिंगमध्ये अधिक नफा असल्याचे सांगून ऑनलाईन डॉलर खरेदी करण्यास भाग पाडून एकाची ५७ लाख ६३ हजारांची फसवणूक झाली आहे. दोन महिन्यांनी त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेव्हीमध्ये इलेक्ट्रिशिअनचे काम करणाऱ्या हरेंद्र सिंग (वय ५३) यांच्यासोबत ही घटना घडली. त्यांना ट्रेडिंगच्या माध्यमातून नफा कमविण्याचा मेसेज आला.

त्यांनी मेसेजला प्रतिसाद दिला असता त्यांना ऑनलाईन ट्रेडिंगमधून दुप्पट नफा मिळविण्याचे आमिष दाखविण्यात आले. सिंग यांनी अज्ञात व्यक्तींवर विश्वास ठेवून त्यांनी पाठविलेल्या माहितीद्वारे वेगवेगळ्या बँक खात्यांवर ५७ लाख ६३ हजार रुपये पाठविले. यानंतर मात्र त्यांना अधिक रक्कम भरण्यास सांगितले जाऊ लागले. त्यामुळे आपली फसवणूक होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

याबाबत त्यांनी खारघर पोलिसांकडे तक्रार केली असता अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेल-वसई मार्गावर दर तासाला मेमू गाडीची मागणी

## प्रवासी संघटना घेणार रेल्वे राज्यमंत्र्यांची भेट

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल-वसई मार्गावर पहाटे ५ ते रात्री ११ वा. पर्यंत दर तासाला मेमू गाडीची पनवेल-वसई-पनवेल फेरीची मागणी प्रवासी करीत आहेत. यासाठी पनवेल प्रवासी संघटना लवकरच आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शनाखाली रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना पत्र देणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी दिली.

मुंबई महानगराचा कारभार २४ तास कार्यरत असतो. मुंबई महानगरातील पश्चिम रेल्वे, मध्य रेल्वेच्या मेन, हार्बर, ट्रान्स हार्बर लाईनवर पहाटे ४ वा. पासून रात्री १ वा. पर्यंत, तर अगदी मेट्रो रेल्वे, सर्व महापालिकांच्या शहरी बससेवा पहाटेपासून अगदी मध्यरात्री उशिरापर्यंत सुरू असतात. अपवाद फक्त उपनगरीय सेवेचा दर्जा दिलेल्या वसई-दिवा-पनवेल रेल्वे मार्गाचा. वसईहून सकाळी सुटणारी पहिली मेमू कोपरला ८ वा. तर पनवेलला ८.५५ वा. पोहचते, तर वसईहून पनवेलला थेट प्रवास करायला दिवसातील शेवटी मेमू संध्या. ४.४५ वा., तर दिवापर्यंत प्रवास करायला दिवसातील शेवटची मेमू ७.१५ वा. वसईहून सुटते.

पनवेलहून थेट वसईपर्यंत प्रवास करायचा असेल तर पनवेलहून वसईसाठी दिवसाची पहिली मेमू सकाळी ९ वा. सुटते व ११.०५ वा. वसईला पोहचते, तर दिवसाची शेवटची मेमू पनवेलहून संध्या. ७.०५ वा. सुटते व वसईला ८.४५ वा. पोहचते.

या मार्गावर तळोजा, डोंबिवली औद्योगिक वसाहत असल्याने रोज हजारो प्रवासी नोकरी धंद्यासाठी प्रवास करीत असतात. त्यामुळे पनवेल-वसई मार्गावर पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत दर तासाला मेमू गाडीची पनवेल-वसई-पनवेल फेरी असणे गरजेचे आहे. रेल्वेचा वसई-भिवंडी-दिवा-पनवेल हा सेक्शन-पालघर, भिवंडी, कल्याण व मावळ अशा चार लोकसभा मतदारसंघात विभागला गेला असल्याने या चारही खासदारांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असाही आग्रह आहे.



## पनवेल परिसरातील आदिवासीवाड्यांमध्ये सेवाभावी संस्थांकडून दिवाळी फराळवाटप

**पनवेल : वार्ताहर**

सत्कर्म श्रद्धालय, गाढेश्वर, लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम, लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि लायन्स क्लब ऑफ खारघर कोपरा यांच्या संयुक्त विद्यमाने नेरेच्या पुढील सर्व वाड्यांमध्ये दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये गाढेश्वर, देहरंग, वाघाची वाडी, दोधानी, धामणी, बाबदेववाडी, माळढुंगी, केळीची वाडी टॉवरवाडी येथील सर्व वाडी वस्तीमध्ये राहणाऱ्या सुमारे १२०० कुटुंबातील वनवासी बांधवांना दिवाळी फराळाचे घरोघरी वाटप करण्यात आले.



फराळात चिवडा, बुंदीचे लाडू, चकली व शंकरपाळे यांचे पॅकेट्स घरोघरी जाऊन वाटण्यात आली.

सुयोग पेंडसे आणि सुरभी पेंडसे यांचे संकल्पनेतून उपक्रम साकार झाला. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी स्वाती गोडसे, एस. डी. चव्हाण, अशोक गिल्डा, संजय गोडसे, गौतम म्हस्के, प्रेमेद्र बहिरा तसेच सत्कर्म श्रद्धालयचे बापट आणि सहकारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# दिघोडे येथील नवीन विद्युत उपकेंद्राचा मार्ग मोकळा

## शासनाची जागा उरण महावितरणाला हस्तांतरित

**उरण : बातमीदार**

तालुक्यातील दिघोडे येथे उरण पूर्व विभागासाठी नवीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी खासदार सुनील तटकरे व महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या सहकार्याने शासकीय जागा महावितरणला हस्तांतरीत करण्यात आली. त्यामुळे लवकरच विजेच्या लपंडावातून नागरिकांची सुटका होणार आहे.

उरण तालुक्यातील करणाऱ्या पूर्व भागात एक नवीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी माजी जि. प. सदस्य वैजनाथ ठाकूर व कुंदा ठाकूर यांनी पाठपुरावा केला होता. उरण पूर्वविभाग हा वीजपुरवठा विद्युतवाहिनी सबस्टेशनपासून



४० किमी अंतरावर एवढे आहे. या वीजवाहिन्या खाडीतील चिखल, दलदल आणि झाडाझुडपातून येत असल्यामुळे अनेकदा तारा तुटून किंवा शॉर्टसर्किट होऊन वीजपुरवठा खंडित होत होता. त्यामुळे या वाहिन्यांची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्यावर उपाययोजना म्हणून उरण पूर्व भागासाठी नवीन सबस्टेशन उभारले पाहिजे, असे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार दिघोडे येथिल सर्व्हे क्र. ११६ (६) क येथील जागा महावितरणाला हस्तांतरित करण्यात आली आहे.

या सबस्टेशनमुळे ग्रामपंचायत विंधणेमधील गावे, भोम, चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई या गावांना याचा फायदा होणार असून, लवकरच यातील चिरनेर, विंधणे, कंठवली, कळंबुसरे सारख्या पुरग्रस्त गावांना पुराच्या वेळी विजेच्या समस्येला देखील तोंड द्यावे लागत होते ती समस्यादेखील आता मार्गी लागणार आहे. या गावांना भूमिगत विद्युत वाहिन्यादेखील टाकण्यात येणार आहेत.

## उरण देवळी ते शिर्डी पदयात्रा

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील देवळी येथील श्री द्वारकामाई पदयात्रा मंडळ यांच्या वतीने देवळी येथील साईबाबा मंदिर येथून साईबाबाची पालखी शुक्रवार (दि. १७) काढण्यात आली. पालखी शिर्डी येथे २५ नोव्हेंबरला पोहचेल, अशी माहिती राजा म्हात्रे यांनी दिली.



साई कुटीर येथे पालखी ठेवून आरती करण्यात आली. पालखी वहाळ, कल्याण, आसनगाव, खर्डी, घाटन देवी मंदिर, हॉटेल शाही दरबार, सिन्नर, सयाले गाव, डोहाळे गाव या मार्गाने पुढे श्री क्षेत्र शिर्डी येथे पोहचेल. पालखी उत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, सेक्रेटरी भूपेंद्र ठाकूर, खजिनदार मनोज कदम, कार्यकारी सदस्य निलेश पाटील, सचिन पागावाड, जयेश पाटील, गणेश माळी, अनिल पाटील, कृष्णा म्हात्रे, सुमित पाटील, अजय म्हात्रे, सहाय्यक कमिटी गणेश पवार, नरेश केणी, राहुल कोळी, रमेश भोळे, जयप्रकाश माळी व साईभक्तांचे सहकार्य लाभले आहे. साई भंडारा २ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता देवळी येथील साई मंदिर येथे ठेवण्यात आला आहे.

# पनवेलच्या प्रसिद्ध वल्लाळेश्वर तलावजवळ पक्षी निरीक्षण सत्र

**पनवेल : वार्ताहर**

सर्वसामान्यजनांना चिमणी, कावळा, कबूतर, पोपट, साळुंकी एवढेच पक्षी माहीत असतात, पण आपल्या अवतीभवती विविध प्रकारचे, रंगाचे, जातीचे पक्षी वावरत असतात. मुलांना आणि मोठ्यांनाही या पक्षीजगताची माहिती व्हावी यासाठी दरवर्षी पक्षीमित्र मारुती चितमपल्ली यांचा वाढदिवस ते पक्षीतज्ज्ञ सलीम अली यांचा जन्मदिवस हा सप्ताह निसर्गप्रेमी आणि पक्षीमित्रांतर्फे पक्षी सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या पक्षी सप्ताहानिमित्त पनवेलमधील अनुभूती या



संस्थेने पनवेल येथील बल्लाळेश्वर तलावाजवळ पक्षी निरीक्षण आणि जागरूकता सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रात पक्षीतज्ज्ञ सुदीप आठवले यांनी उपस्थित लहान-मोठ्यांना दुर्बिणीद्वारे तलावातील दूरचे पक्षी दाखवून त्याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. यात त्यांनी पांढ्या छातीचा खंड्या, पांढर्या छातीची पाणकोंबडी, जांभळी पाणकोंबडी, कमळपक्षी, हळदकुंकू बदक, वटवट्या इत्यादी वेगवेगळ्या प्रकारच्या पक्ष्यांची ओळख तसेच त्यांचा अधिवास, त्यांचं अन्न, त्यांचे लाईफ सायकल इत्यादी माहिती सांगितली.

लहान मुलांना तर पक्ष्यांबद्दल बरीच उत्सुकता होती आणि सुदीप यांनी त्यांना समग्र माहिती पुरवून त्यांचे समोधानही केले.



## उरणच्या आगरी युवकाचा जपानमध्ये पुरस्काराने सन्मान

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील चिर्ले येथील समिर पाटील यांना यशस्वी जपानमध्ये उद्योजकचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

समिर पाटील यांनी वयाच्या २२व्या वर्षी आर्यन ग्रुप ऑफ कंपनीची स्थापना केली व पाच वर्षांच्या आत ही कंपनी बंदर, गोदी क्षेत्रात मालाची ने-आण करणारी व्यवसायातील धाडसी कंपनी बनली. चिर्ले या लहानशा खेडेगावातील सुधाकर पाटील यांच्या घरी समिर पाटील यांचा जन्म झाला. शाळा, कॉलेजचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपण नोकरी न करता उद्योग क्षेत्रात उतरावे या महत्त्वाकांक्षी विचारातून



समिर पाटील या आगरी युवकांनी आर्यन ग्रुप ऑफ कंपनीची स्थापना २००४ साली केली. आज बंदर, गोदी क्षेत्रात मालाची ने-आण करणारी व्यवसायातील धाडसी कंपनी बनली असून त्यांनी खेड्यापाड्यातील अनेक तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.

त्यांच्या उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल बंदर, गोदी येथील टाटा समूहाच्या जपानी शिष्टमंडळाने घेऊन त्यांना यशस्वी उद्योजक म्हणून जपान येथे गौरविण्यात आले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कोकण महसूल विभागाकडून विविध योजनांची आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रमे, विकास कामांचा आढावा घेणारी मासिक आढावा बैठक अप्पर मुख्य सचिव महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क डॉ. राज गोपाल देवरा यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



या बैठकीत कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी मुंबई शहर राजेंद्र क्षीरसागर, जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी पालघर गोविंद बोडके, जिल्हाधिकारी रायगड डॉ. योगेश म्हसे, जिल्हाधिकारी रात्नागिरी एम देवेंदर सिंह, उपआयुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपआयुक्त (समान्य प्रशासन) अजित साखरे, उपआयुक्त (नियोजन) प्रमोद केंभावी, उपआयुक्त (नगरपालिका प्रशासन) रविंद्र जाधव, उपआयुक्त (विकास) गिरीष भालेराव, अप्पर जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग रवी पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कोकण भवनातील पहिल्या मजल्यावरील नूतनीकरण करण्यात आलेल्या महसूल शाखेचे अप्पर मुख्य सचिव महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क डॉ. राज गोपाल देवरा यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले, तसेच यावेळी कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या कोकण महसूल विभागाच्या www.divcomkonkan.in या संकेतस्थळाचे देखील डॉ. राज गोपाल देवरा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या संकेतस्थळावर महसूल विभागाचा इतिहास, कोकण विभागाची भौगोलिक स्थिती, ई-निविदा, परिपत्रके, बातमी पत्रके, महसूल विभागामार्फत २०१५ ते २०१७ दरम्यानचे शासन निर्णय आणि अधिसूचनांचे संकलन, विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालये व संपूर्ण महसूल यंत्रणांचे संपर्क क्रमांक उपलब्ध आहेत, तसेच पर्यटनाविषयीची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## संपादकीय

# दुर्दैवी राडा

स्वर्गीय बाळासाहेबांच्या अकराव्या स्मृतिदिनी त्यांचे विचार, त्यांच्या आठवणी आणि त्यांची शिकवण यांचे स्मरण व्हायला हवे होते, परंतु दुर्दैवाने याच्या अगदी उलट घडले. ठाकरे गटाच्या काही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला शिवतीर्थावर जो धिंगाणा घातला, तो निंदनीय होता.

**महाराष्ट्राचे दैवत हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या अकराव्या स्मृतीदिनाला खरे तर राज्यभर काही विधायक उपक्रम अथवा कार्यक्रम झाले असते तर ते खचितच शोभून दिसले असते. स्व. बाळासाहेबांनी मराठी माणसाला अस्मितेचे वरदान दिले. ताठ मानेने संकटांशी झुंजण्याची प्रेरणा दिली. मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाला कडाडून वाचा फोडली. स्व. बाळासाहेबांचे हे ऋण कुठल्याही मराठी माणसाला विसरता येणे शक्य नाही. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण असे त्यांचे समीकरण होते. त्यानुसारच ते आयुष्यभर वागले. स्व. बाळासाहेबांना खोटेपणाची चीड होती. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांचे ते शेलक्या शब्दांत वाभाडे काढत, कारण लांगुलचालनाचे राजकारण त्यांना मनस्वी चीड आणत असे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते शरद पवार यांच्याशी त्यांचे अधूनमधून राजकीय दोन हात होत असत, पण वैयक्तिक कटुता किंचितही नसे. किंबहुना, बाळासाहेबांना राजकारणाच्या पलिकडे जाऊन नातेसंबंध जपण्याची अलौकिक देणगीच होती. दुर्दैवाने त्यांच्या पश्चात हे सारेच धुळीला मिळाले. काँग्रेससोबत जायची वेळ आली तर मी माझे दुकान बंद करीन असे ते म्हणत असत, पण त्यांच्या पश्चात खुर्चीच्या लालसेपायी त्यांचा पक्ष काँग्रेसच्या मांडीवरच जाऊन बसला. बाळासाहेबांची तत्त्वे आणि त्यांचे विचार खुंटीवर टांगले गेले म्हणूनच त्यांनी स्थापलेल्या पक्षाची पडझड झाली. बाळासाहेबांनी ज्यांना आपले उत्तराधिकारी म्हणून नेमले होते, त्यांनीच खुर्चीसाठी सारे काही दावणीला बांधावे हे दुर्दैवच. सुदैवाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारखा धाडसी शिवसैनिक खंबीरपणे उभा राहिला म्हणूनच शिवसेना टिकली. स्मृतिदिनाच्या पवित्र दिवशी वादविवादाचे गालबोट नको या परिपक्व विचारनिशीच मुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या समर्थकांनी गुरुवारी संध्याकाळी शिवतीर्थावर जाऊन स्व. बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळावर मस्तक टेकवले. त्यांच्यासोबत त्यांच्या गटातील अनेक नेते, आमदार व पदाधिकारी होते. मुख्यमंत्र्यांच्या या शिवाजी पार्क भेटीनंतर ठाकरे गटाचे काही नेते घोषणा देत तेथे जमले आणि अर्वाच्च शिविगाळ करीत स्मृतिस्थळावर गोमूत्र शिंपडण्याचा नस्ता उद्योग त्यांनी केला. या वेळेस तेथे असंख्य महिलादेखील उपस्थित होत्या. तरीही ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी घोषणा देताना जी भाषा वापरली, तिचा धिक्कार करावा तेवढा थोडाच आहे. शिवतीर्थाचे 'शिवीतीर्थ' झाले अशी कडवट प्रतिक्रिया समाजमाध्यमांमध्ये उमटली ती काही उगाच नव्हे. बाळासाहेबांची शिवसेना ही मराठी माणसांची लढाऊ संघटना होती व अजूनही आहे, परंतु ठाकरे गटाने शिवतीर्थावर जो तमाशा केला त्याला लढाऊपणा म्हणत नाहीत. आपल्या परमदैवताच्या स्मृतिस्थळाशीच आपण आक्षेपार्ह वर्तन करीत आहोत याचे भानही त्यांना राहिले नाही. या प्रकाराचे उर्मट समर्थन ठाकरे गटाचे नेते आणि प्रवक्ते पुढला संबंध दिवस करीत राहिले. मुख्यमंत्री शिंदे यांचे वर्तन मात्र परिपक्व नेत्यासारखे होते. मनात आणले असते तर ते स्मृतिदिनी शिवाजी पार्क येथे सहज जाऊ शकले असते, पण वाद नको म्हणून त्यांनी आदल्या दिवशी जाणे पसंत केले. तरीही ठाकरे गटाने आपली पातळी दाखवलीच. स्मृतिदिनाच्या पवित्र दिवशी झालेला हा राडा दुर्दैवीच म्हटला पाहिजे.**

# शेतकऱ्यांसाठी परसातील कुक्कुट पालन योजना

रायगड जिल्ह्यामध्ये परसातील कुक्कुट पालनास प्रोत्साहन देत ही प्रक्रिया रोजगारक्षम करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावर सघन कुक्कुट विकास गटाची स्थापना करणे ही योजना २०१७-१८पासून राबवण्यात येत असून श्रीवर्धन, सुधागड-पाली, कर्जत व अलिबाग या तालुक्यातून पुरेसा प्रतिसाद अद्यापपर्यंत न मिळाल्याने या योजनेसाठी नव्याने अर्ज मागवण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे यांनी दिली.



चार तालुक्यातून प्राप्त अर्जातून प्रत्येकी एका लाभार्थ्याची जिल्हा निवड समितीमार्फत निवड करण्यात येईल. या योजनेंतर्गत तपशील- जमीन-२५०० चौ.फूट (१००० चौ. फुटाचे दोन शेड) खाद्य, अंडी साठवणूक व अंडी उबवणूक यंत्र ठेवण्यासाठी स्वतंत्र खोल्या. शासन/लाभार्थी सहभाग-जमीन व खोल्या लाभार्थीच्या स्वत:च्या मालकीच्या असतील, एकूण अंदाजित किंमत-निरंक. तपशील- प्रति १००० चौ. फुटाचे दोन पक्षीगृहाचे बांधकाम, स्टोअर रूम, पाण्याची टाकी, विद्युतीकरण, शासन/लाभार्थी सहभाग-शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु.चार लाख. तपशील-खाद्य व पाण्याची भांडी, ब्रडर, इतर उपकरणे व लसीकरण, शासन/लाभार्थी सहभाग-शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु. ५० हजार. तपशील- अंडी उबवणूक यंत्र, शासन/लाभार्थी सहभाग- शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु. एक लाख ८० हजार.

तपशील-एक हजार एकदिवसीय मिश्र (नर+मादी) पिले प्रति पक्षी रु.६०/-, शासन/लाभार्थी सहभाग-शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु. ६० हजार. तपशील-२० आठवड्यांची अंड्यावरील ५०० पक्षी (नर+मादी) प्रति पक्षी १५०, शासन/लाभार्थी सहभाग-शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु.७५ हजार. तपशील-१००० एकदिवसीय पिलांसाठी २० आठवडे कालावधीपर्यंत पक्षी खाद्य पुरवठा (प्रति पक्षी एकूण ८.५० कि.ग्रॅम खाद्य प्रति किलो रु.२५ दराने), शासन/लाभार्थी सहभाग- शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु.१,१२,५००. तपशील- एग नेस्ट्स, शासन/लाभार्थी सहभाग-शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु.३० हजार. तपशील-पक्षी खाद्य ग्राईंडर (सिंगलफेज), शासन/लाभार्थी सहभाग-शासन+लाभार्थी, एकूण अंदाजित किंमत रु.१६ हजार अशी एकूण अंदाजित रक्कम रु.१० लाख २७ हजार ५००.

याप्रमाणे एकूण रक्कम रु.१० लाख २७ हजार ५००पैकी सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५०% अनुदान म्हणजेच रु. पाच लाख १३ हजार शासनाचे अनुदान देय राहील. लाभार्थी निवड ही सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपाय योजना व जनजाती क्षेत्र उपाय योजनेतील जे लाभार्थी सद्य:स्थितीत कुक्कुट पालन व्यवसाय करत आहेत, तसेच ज्या लाभार्थ्यांकडे अंडी उबवणुकीचे यंत्र आहे अशा लाभार्थीना प्राधान्य राहील. निवड केलेल्या लाभार्थीना हा प्रकल्प ३ वर्ष कार्यान्वित ठेवणे बंधनकारक राहील. निवड केलेल्या लाभार्थ्यांना पाच दिवसांचे कुक्कुट पालन विषयक प्रशिक्षण व खासगी अंडी उबवणूक केंद्र, शासकीय अंडी उबवणूक केंद्र, लघु अंडी उबवणूक यंत्राचा वापर करीत असलेल्या प्रक्षेत्रावर भेटीचा समावेश आहे. लाभार्थी निवड ही जिल्ह्याच्या पशुसंवर्धन उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णयाप्रमाणे सात सदस्यांच्या गठीत समितीपुढे केली जाणार आहे.

या योजनेंतर्गत पशुसंवर्धन विभागाने परिपत्रित केलेल्या अर्जाचा नमूना तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी विस्तार यांच्याकडे उपलब्ध राहील. या योजनेंतर्गत निवडलेल्या लाभार्थीकडे २५०० चौ. फुट जागा स्वत:च्या मालकीची असावी. त्या ठिकाणी दळणवळण, इलेक्ट्रिसीटी, पाण्याची सोय उपलब्ध असावी. या योजनेचे अनुदान एकदाच देय असून प्रकल्प कार्यान्वित ठेवणेसाठीचा पुढील खर्च संपूर्णपणे लाभार्थीने करावयाचा आहे. या योजनेंतर्गत एक हजार चौ. फुट पक्षीगृहाचे बांधकाम खात्याने ठरवून दिलेल्या मोजमापाप्रमाणे असणे आवश्यक आहे. लाभार्थीने लघु अंडी उबवणूक यंत्राची खरेदी करताना किमान एक हजार अंडी उबविण्याची क्षमता व किमान १४ केव्हीए क्षमतेचा डिझेल अथवा गॅसवर चालणारे जनरेटर यंत्र असावे. यंत्राची उभारणी व कनेक्शन व दोन वर्षाची वॉरंटी, अंडी उबवणूक यंत्र उत्पादकाकडून लाभार्थीस प्रशिक्षण दिलेले असावे. प्रकल्प उभारणीनंतर योजनेमध्ये समाविष्ट तपशीलाची पडताळणी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल. निवड झालेल्या लाभार्थीने मान्यताप्राप्त एक दिवशीय मिश्र पिल्ले, २० आठवडे वयावरील अंड्यांवरील पक्षी, उबवणुकीचा अंडी यांची खरेदी सघन कुक्कुट विकास गट/मध्यवर्ती व इतर शासकीय निमशासकीय संस्था कडून जिल्हा स्तरीय निवड समितीच्या शिफारशीने खरेदी करणे बंधनकारक राहील. खरेदीच्या पावत्या, डिलेव्हरी चलन यांची पडताळणी केल्यानंतरच अनुदान थेट लाभार्थीच्या बँक खात्या मध्ये जमा करण्यात येईल. सुरूवातीस आवश्यक लघु अंडी उबवणूक केंद्रास लागणारी अंडी शासकीय संस्थेकडून खरेदी करणे बंधनकारक राहील. तदनंतर लाभार्थीने स्वत:च्या प्रक्षेत्रावर उत्पादित उबवणुकीच्या अंड्यांचा वापर करून पिल्ले निर्मिती करणे आहे.

अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांनी १३ नोव्हेंबर, २०१७चा शासन निर्णय व २३ नोव्हेंबर, २०१७च्या मार्गदर्शक सूचनानुसार अभ्यासपूर्वक बाबी अभ्यासूनच अर्ज करावा, जेणेकरून अर्जदाराचा नाहक खर्च होणार नाही. सूचना व योजनेच्या अंमलबजावणी बाबत तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा.

**-रायगड जिल्हा माहिती कार्यालय**

# स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक बटुकेश्वर दत्त

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतिकारक बटुकेश्वर दत्त यांचा जन्म बंगाल प्रांतामधील ओरी या गावात १८ नोव्हेंबर १९१० रोजी झाला. कानपूरच्या पीपीएन महाविद्यालयात शिकत असताना थोर क्रांतिकारक भगतसिंग यांच्याशी त्यांची ओळख झाली.

भगतसिंग यांच्या विचारांनी प्रभावित होऊन दत्त हे सुरुवातीला कानपूरमध्ये हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या क्रांतीकारी संघटनेत कार्य करू लागले. या संघटनेत काम करीत असतानाच त्यांनी बॉम्ब बनविण्याचे तंत्र शिकून घेतले व त्यांच्या पुढाकाराने आग्रा येथे एक बॉम्ब बनविण्याचा कारखाना गुप्तपणे चालू करण्यात आला.

लाहोर येथे सायमन आयोगाविरुद्ध निदर्शने करताना झालेल्या जबर लाठीहल्ल्यात ज्येष्ठ क्रांतिकारक लाला लजपतराय हे जखमी होऊन पुढे त्यांचे निधन झाले (१९२८). लालाजींच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी भगतसिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लाठीहल्ल्याचा



मुख्य सूत्रधार पोलीस अधिकारी स्कॉट याचा खून करण्याचे ठरविले. तथापि या हल्ल्यात स्कॉटऐवजी दुसरा पोलीस अधिकारी सॉंडर्स मारला गेला.

ब्रिटिश सरकारला अनिर्बंध सत्ता व अधिकार मिळवून देणारी दोन अन्याकारक विधेयके (ट्रेड डिस्प्यूट बिल व पब्लिक सेफ्टी बिल) ब्रिटिश सरकार लादणार होते. या विधेयकांना विरोध करण्यासाठी व लालाजींच्या मृत्यूचा निषेध करण्यासाठी बटुकेश्वर दत्त आणि भगतसिंग यांनी दिल्लीच्या केंद्रीय सभागृहात ८ एप्रिल १९२९ रोजी ही विधेयके मांडण्यात आली तेव्हा प्रेक्षकसज्ञातून कोणालाही हानी होणार नाही अशा पद्धतीने बॉम्ब फेकला, त्यानंतर पळून न जाता दोघेही इन्कलाब जिंदाबाद घोषणा देत सरकारच्या स्वाधीन झाले.

भारतीय स्वातंत्र्यानंतर अंजली या युवतीशी त्यांनी विवाह केला (१९४७) व पाटणा येथे स्थायिक झाले. दिल्ली येथे त्यांचे निधन झाले.

**(साभार : विश्वकोष मराठी)**



## बदलते तंत्रज्ञान

# जगातील सर्वांत वेगवान इंटरनेट स्पीड लॉन्च

चीनच्या कंपनीनं जगातील सर्वात वेगवान इंटरनेट नेटवर्क लॉन्च केले आहे. हा प्रकल्प सिंघुआ विश्वविद्यालय,




चायना मोबाईल, हुआवेई टेक्नोलॉजीज आणि सेर्नेट कॉर्पोरेशनच्या मदतीनं पूर्ण केला आहे. लॉन्च करण्यात आलेले इंटरनेट १.२ टेराबिट डेटा प्रति सेकंद ट्रान्समिट करू शकते असा दावा करण्यात आला आहे. इंटरनेटचा हा स्पीड सध्या अस्तित्वात असलेल्या स्पीडच्या दहा पट जास्त आहे. २०२५ मध्ये चीन हा इंटरनेट स्पीड लॉन्च करणार होते परंतु वेळेआधीच चीननं हे यश संपादन केले आहे.

साऊथ चायना पोस्टनुसार, सध्या अस्तित्वात असलेल्या इंटरनेट स्पीडच्या दहा पट अधिक स्पीड मिळणे ही एकप्रकारे क्रांती आहे. पुढील पिढीसाठी ही इंटरनेट सेवा आहे. चीनचा नवा बँकबॉन नेटवर्क देशातील प्रमुख शहरांना जोडणारा डेटा हायवे असणार आहे. ३ हजार किमीहून अधिक पसरलेला हा नेटवर्क एका व्यापक ऑप्टिकल फायबर केबलिंग प्रणालीच्या माध्यमातून बीजिंग, वुहान आणि गुआगंजोला जोडेल. जिथं प्रति सेकंद १.२ टेराबिट्स म्हणजे १२०० गीगाबिट्सचा स्पीड मिळेल. जगातील बहुतांश इंटरनेट बॅकबॉन नेटवर्क १०० गीगाबिट प्रति सेकंद काम करतात. अमेरिकेने अलीकडेच ४०० गीगाबिट्स प्रति सेकंदवर ५ जी नेटवर्क आणले आहे.

चीनमधील ३ मोठी शहरे, बीजिंग, वुहान आणि गुआंगजो कनेक्शन हा भविष्यातील इंटरनेट टेक्नॉलॉजी इन्फास्ट्रक्चरचा भाग आहे. या जुलै महिन्यात हे नेटवर्क कार्यरत झाले होते. परंतु सोमवारी अधिकृतपणे ते लॉन्च करण्यात आले. नेटवर्कने सर्व चाचण्या पार केल्या आहेत. त्यात उत्तमप्रकारे यश मिळाले आहे. हा इंटरनेट स्पीड साध्या भाषेत समजायचा झाला तर केवळ एका सेकंदात १५० हाय डेफिनिशन सिनेमाच्या तुलनेत हा डेटा ट्रान्सफर करू शकतो असं हुआवेई टेक्नोलॉजीचे उपाध्यक्ष वांग लेई यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, सुपरफास्ट लाईन न केवळ एक यशस्वी ऑपरेशन होते तर हे चीनला आणखी वेगवान इंटरनेट बनवण्याचं तंत्रज्ञान देते. सिंघुआ विश्वविद्यालयच्या जू मिंगवेईने नवीन इंटरनेट बॅकबॉनची तुलना सुपरफास्ट ट्रेनच्या ट्रॅकची केली आहे. विशेष म्हणजे या प्रणालीचे सर्व सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरचे उत्पादन देशांतर्गत केले आहे असं चायनीज एकेडमी ऑफ इंजिनिअरींग एफआयटीआय प्रोजेक्ट लीडर वू जियानपिंग यांनी म्हटलं आहे.

# चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व्ही. शांताराम

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिभावंत निर्माता, दिग्दर्शक, नट व पटकथाकार व्ही. शांताराम संपूर्ण नाव शांताराम राजाराम वणकुद्रे यांचा जन्म कोल्हापूर येथे १८ नोव्हेंबर १९०१ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे किराणा मालाचे दुकान होते व कुटुंबाची आर्थिक स्थिती यथातथाच होती. त्यामुळे शालेय शिक्षण झाल्यावर सुरुवातीला त्यांनी अल्प वेतनावर नोकरी केली. अशा प्रतिकूल काळातच ते दादासाहेब फाळके यांचे चित्रपट, बालगंधर्वांची नाटके, भारतीय व पाश्चात्त्य संगीत अशा कलाक्षेत्रांकडे आकर्षित झाले आणि परिश्रम, कल्पकता व स्वयंप्रेरणा यांच्या बळावर शिकत जाऊन श्रेष्ठ दिग्दर्शक बनले.



**निमित्त**

१९१४ साली त्यांनी बालगंधर्वांच्या 'गंधर्व नाटक मंडळी'त नट म्हणून प्रवेश केला. १९२० साली फाळके यांच्या पौराणिक मूकपटांच्या यशाने प्रेरित होऊन कोल्हापूरला प्रसिद्ध चित्रकार बाबूराव पेंटर यांनी स्थापलेल्या 'महाराष्ट्र फिल्म कंपनी'त ते सामील झाले. बाबूराव पेंटर यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रपट कलेची मूळाक्षरे तेथे त्यांनी गिरविली. नेपथ्य, छायाचित्रण, संकलन, अभिनय, खास दृश्ये (स्पेशल इफेक्ट्स) अशा प्रत्येक शाखेतील बारकावे व्ही. शांताराम यांनी तेथे अभ्यासले. याच कंपनीत असताना बाबूराव पेंढारकर यांनी त्यांचे 'व्ही. शांताराम' असे चित्रपटीय नामकरण केले.

महाराष्ट्र फिल्म कंपनीने त्या काळात अनेक मूकपट काढले. त्यांपैकी सुरेखाहरण (१९२१) या पौराणिक मूकपटातील कृष्णाच्या भूमिकेद्वारे त्यांनी रुपेरी पडद्यावर प्रवेश केला. विशेषतः सावकारी पाश (१९२५) या सामाजिक वास्तवाचे अत्यंत प्रभावी चित्रण करणाऱ्या मूकपटाचा शांतारामबापूंवर सखोल परिणाम झाला.

१९२९ साली कोल्हापूर येथे प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. या नव्या कंपनीमुळे भारतीय चित्रपटसृष्टीत एका सुवर्णयुगाला प्रारंभ झाला. या कंपनीने व्ही. शांताराम यांच्या दिग्दर्शनाखाली गोपाळकृष्ण (१९२९), खुनी खंजर (१९३०), रानीसाहिबा (१९३०), उदयकाल (१९३०), जुलूम (१९३१), चंद्रसेना (१९३१) इ. पौराणिक व देमार (स्टंट) मूकपट निर्माण केले. १९३२ साली आयोध्येचा राजा हा मराठी (हिंदी अयोध्याका राजा) पहिला बोलपट निर्माण करण्यात आला. त्याचे संगीतदिग्दर्शक गोविंदराव टेंबे होते व प्रमुख भूमिका दुर्गा खोटे, बाबूराव पेंढारकर, मास्टर विनायक इ. नामवंत अभिनेत्यांनी केल्या होत्या. या बोलपटातील इंद्रदरबाराचे नेपथ्य अतिशय नेत्रदीपक होते.

भारतीय चित्रपटसृष्टीत 'बायपॅक' पद्धतीने तयार केलेला पहिला रंगीत बोलपट म्हणजे शांताराम दिग्दर्शित सैरंध्री (१९३३). १९३३ मध्ये 'प्रभात'चे स्थलांतर कोल्हापूरहून पुणे येथे झाले. अमृतमंथन (१९३४) या चित्रपटात व्ही. शांताराम यांनी आपले तांत्रिक कौशल्य सिद्ध केले.

चमत्कृतिपूर्ण थरारक दृश्ये, तसेच नामवंत अभिनेते यांमुळे हा भारतातील पहिला रौप्यमहोत्सव साजरा करणारा चित्रपट ठरला. शांताराम दिग्दर्शित चंद्रसेना हा पौराणिक चित्रपट (१९३५) मराठी, हिंदी, तमिळ अशा तीन भाषांत होता.

**(साभार : विकासपिडीया)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : सकाळच्या मंद प्रकाशात सूर्योदय होत असताना सुधीर नाझरे यांनी एकदरा येथे टिपलेले मनमोहक छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# एक ग्लास दूध, दोन खजूर महिलांसाठी फायदेशीर!



आजकालच्या बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांना अनेक शारिरीक समस्यांचा सामना करावा लागतो. मग हार्मोन्सशी संबंधित समस्या, अशक्तपणा, थकवा अशा अनेक समस्या महिलांना सतावत असतात. तर या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी महिला अनेक उपाय करत असतात. पण त्यांना हवा तसा रिझल्ट मिळत नाही. तर तुम्हालाही हार्मोन्सशी संबंधित समस्यांपासून सुटका हवी असेल तर खजुर आणि दूधाचे सेवन करा. महिलांनी एक ग्लास दूधासोबत खजूर खाल्लं तर काय फायदे होतात याबाबत जाणून घेणार आहोत.

मासिक पाळी नियमित होण्यात मदत - बहुतेक महिलांना मासिक पाळी वेळेवर येत नाही. तसंच काही महिलांना पाळीशी संबंधित अनेक समस्या निर्माण होताना दिसतात. तर अशावेळी महिलांनी दूध आणि खजूर खाणं फायदेशीर ठरतं. कारण दूधासोबत खजूर खाल्ल्याने शरीरातील उष्णता वाढते आणि रक्त देखील वाढते. सोबतच रक्तप्रवाह देखील सुरळीत होतो त्यामुळे मासिक पाळी नियमित येण्यास मदत होते. तसेच दुधासोबत खजूर खाल्ल्याने तुम्हाला जास्त भूक लागत नाही आणि तुमचं वजन देखील नियंत्रणात राहते.

हार्मोन्सशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत - दूधासोबत खजूर खाल्ल्यामुळे हार्मोन्सशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत होते. त्यामुळे महिलांनी दूध आणि खजूर खाण खूप फायदेशीर ठरते. खजूर महिलांच्या लैंगिक आरोग्यास प्रोत्साहन देते. तसंच इस्ट्रोजेन पातळी देखील संतुलित करण्यास मदत करते. महत्त्वाचं म्हणजे खजूर आणि दूध झउजऊ च्या समस्येपासून महिलांचा बचाव करते. तर मासिक पाळीदरम्यान स्त्रियांमध्ये राग, चिडचिड होत असते तर खजूर खाल्ल्यामुळे यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.


ॲनिमियापासून सुटका - दररोज सकाळी दूधासोबत खजूर खाल्ल्यामुळे ॲनिमियाचा त्रास कमी होण्यास मदत होते. त्यामुळे खजूर आणि दूधाचा समावेश आहारात करणं गरजेचं आहे. खजूर आपल्या शरीराला लोह, व्हिटॅमिन सी, फायबर देते. तसंच गरम दुधात खजुर टाकून ते खाल्लं तर हिमोग्लोबिनची पातळी वाढवण्यास मदत होते.

# रायगडातील २८ धरणांत ८८.३५ टक्के पाणीसाठा

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात २८ धरणात सरासरी ८८.३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी २०२२मध्ये सरासरी ९०.७८ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता.

रायगड जिल्ह्यात अद्याप पाच धरण क्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे, तर १८ धरण क्षेत्रात ८० टक्केपेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध आहे. श्रीवर्धन तालुक्यातील रानिवली धरणात सर्वात कमी ५८ टक्के, कार्ले धरण क्षेत्रात ७० टक्के, उरण तालुक्यातील पुनाडे धरण क्षेत्रात ६० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.



पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत २८ धोरण येत असून या धरणात प्रामुख्याने मुरूड तालुक्यातील फणसाड धरणात ९६ टक्के पाणीसाठा, तळा तालुक्यातील वावा धरणात ९४ टक्के, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणात ९७ टक्के, पेण तालुक्यातील आंबेघर धरणात ८७ टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरणात ९० टक्के, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरणात ८६ टक्के, घोटवडे धरणात ८४ टक्के, ढोकशेत धरणात ८२ टक्के, कवेळे धरणात ७६ टक्के, उन्हेरे धरणात ८० टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणात ७० टक्के, कुडकी धरणात ९४ टक्के, रानिवली धरणात ५८ टक्के, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणात ९९ टक्के, संदेरी धरणात ९२ टक्के, महाड तालुक्यातील वरंध धरणात १०० टक्के, खिंडवाडी धरणात १०० टक्के, कोथुर्डे धरणात १०० टक्के, खैरे धरणात १०० टक्के, कर्जत तालुक्यातील साळोख धरण क्षेत्रात ८९ टक्के, अवसरे धरण क्षेत्रात ८९ टक्के, खालापूर तालुक्यातील भिलवले धरणात १०० टक्के, कलोते मोकाशी धरणात ९४ टक्के, डोणवत धरणात ७९ टक्के, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणात ९६ टक्के, बामणोली धरणात ९१ टक्के, उसरण धरण क्षेत्रात ९१ टक्के, उरण तालुक्यातील पुनाडे धरणात ६० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

## निवडक

### सफाई कामगारांना मिठाईचे वाटप



**महाड** : नगरपालिका हद्दीतील कचरा व नालेसफाई करणाऱ्या सफाई कामगारांना मिठाई वाटप करून त्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न दस्तुरीनाका मित्रमंडळामार्फत करण्यात आला. या वेळी मंडळाचे अध्यक्ष रोहित गोविलकर, सिद्धेश सुतार, रितेश सुतार, भूमीत भगत, प्रणित गांधी, निमीश गांधी, निखिल महाडिक, शुभम महाडिक, धनंजय पिंपळे, पूजा गोविलकर, अनुज हरवंदे, रोहन पाटोळे, सुहास चव्हाण इ. मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. आपण सणांचा आनंद घेत असताना जे नेहमी काम करत असतात त्यांनाही आनंदात सामावून घेण्यासाठी हा उपक्रम राबवत असल्याचे मंडळाचे अध्यक्ष रोहीत गोविलकर यांनी सांगितले.

### परस्पर पतसंस्थेची कार्यकारिणी जाहीर



**मुरूड** : शहरातील परस्पर सहकारी पतसंस्थेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी विजय पैर यांची निवड झाली तर उपाध्यक्षपदी राजू पोतनीस यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून दीपक राजपूरकर, विनायक भगत, विजय भोय, प्रभाकर मसाल, विजय भगत, अपर्णा सुभेदार, आदिती भोसले, विनय मथुरे यांचीही निवड करण्यात आली. या वेळी मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष फैरोज घलटे, माजी नगरसेवक संजय गुंजाळ, तालुका सुपारी खरेदी विक्री संघाचे चेरमन बाबा दांडेकर, संदेश दांडेकर, हसमुख जैन, नरेंद्र हेदुलकर, योगेंद्र गोयजी, दिनेश बापलेकर, राकेश मसाल, बाळा भगत, नियंत्रण मंडळ अध्यक्ष प्रभाकर मसाल, भाऊ भगत, विजय भोय, दीपक राजपूरकर, विनय मथुरे, सभासद उपस्थित होते.

## वरोसे आंबेवाडी आणि बोरगाव खुर्द येथे भाजपचे उपसरपंच बिनविरोध



**चौक : प्रतिनिधी**

भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे आणि खालापूर तालुका मंडळ प्रमुख प्रवीण मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरोसे आंबेवाडी आणि बोरगांव खुर्द येथे भाजपचे उपसरपंच विराजमान झाले आहेत.

ठाकरे गटाला आव्हान देत भाजपने बोरगाव खुर्द आणि वरोसे आंबेवाडी या दोन्ही ग्रामपंचायत एकहाती जिंकल्या आहेत. उपसरपंचपदाच्या निवडणुकीत शुक्रवारी बोरगाव खुर्द येथे थेट सरपंच जागृती मोरे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची निवडणूक झाली. कमळू पारधी यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांना बिनविरोध उपसरपंच निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले.

वरोसे आंबेवाडी येथे सरपंच पार्वती भस्मा यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची निवडणूक झाली. या वेळी मनीषा भस्मा यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांनाही बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. उत्तर रायगड जिल्हा भाजपचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडळ प्रमुख प्रवीण मोरे, माजी सरपंच प्रितेश मोरे यांनी दोन्ही सरपंच व उपसरपंचांचे अभिनंदन केले आहे.



## साळाव ग्रामपंचायत उपसरपंचपदी दिनेश बापलेकर

### सरपंच वैभव कांबळी यांनी पदभार स्वीकारला

**मुरुड : प्रतिनिधी**



तालुक्यातील साळाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी दिनेश बापलेकर यांची निवड करण्यात आली आहे, तर थेट सरपंच म्हणून निवडून आलेले वैभव अनंत कांबळी यांनी पदभार स्वीकारला.

ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवारी (दि.१७) उपसरपंचांची निवडणूक निरीक्षक कपिल वेहेले व त्यांना सहाय्यक म्हणून ग्रामसेवक चेतन मगर यांच्या उपस्थित घेण्यात आली. भाजपचे थेट सरपंच वैभव कांबळी तर राष्ट्रवादी काँग्रेसचे दिनेश बापलेकर यांची उपसरपंचपदी निवड झाली आहे.

या वेळी भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर, मुरूड तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर, आप्पा कांधारे, उपाध्यक्ष बाळा भगत, सरचिटणीस नरेश वारगे, तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना भाजप नेते दिलीप भोईर यांनी, या ग्रामपंचायतीमध्ये भाजपला काम करण्याची संधी दिलीत त्याबद्दल ऋण व्यक्त केले. सरपंच हा जनतेचा आहे. लवकरच येथे विकास कामांची सुरुवात करणार आहोत. सर्वप्रथम जलजीवन मिशन योजनेचे काम पूर्ण करून प्रत्येक घराला नळकनेक्शन देण्यात येणार आहे. महिला बचत गटांना घरघंटी देणार आहोत. महिलांना प्रशिक्षण देऊन शिलाई मशीनचेही वाटप करणार असल्याचे सांगितले.


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my clients **M/S. R. S. AVENUE through its Partner 1) Mr. SUNIL DAVINDRA KHANNA & 2) Mr. AAKASH OMPRAKASH BATRA,** registered office address Office No.614, The Great Eastern Galleria, Plot 20, Sector 4, Nerul Navi Mumbai 400706 has purchased 350 Sq.mtrs. of plot of land bearing no. Plot No.359, Sector19, Ulwe Node, from **MR. MOHAMMED YUSUF CHAUDHARY Proprietor M/s Mega Group** Office Address 109, Satra Plaza, Sector 19, Vashi, Navi Mumbai.

**SCHEDULE OF PLOT**

| Village Name | Plot No. | Sector No. | Area |
|---|---|---|---|
| ULWE | 359 | 19 | 350 Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said property by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of 15 days from the date of publication hereof otherwise the transaction / sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

Date - 17.11.2023
Place - Panvel

sign/-
**Mr. Nityanand Ram Thakur**
Advocate

**Address :** At Kopar, Post: Gavhan, Tal: Panvel, Dist : Raigad, Maharashtra, Pin No. 410206.
E-mail: menityanand@rediffmail.com


### नंबरप्लेट व कागदपत्रे नसलेल्या गाडीवर गुन्हा

**श्रीवर्धन** : येथे फिरण्यासाठी सणसवाडी येथून आलेल्या चार तरुणांच्या कारला नंबरप्लेट व गाडीचे कागदपत्र नसल्याने श्रीवर्धन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या तरुणांना अनेक ठिकाणी थांबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. अखेर श्रीवर्धन पोलिसांनी शहरातील बाजारपेठेत अडवून त्यांना ताब्यात घेतले.

### माथेरानमध्ये पर्यटकांच्या गर्दीने वाहतूक कोंडी

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये सध्या दिवाळी सुट्टी साजरी करण्यासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक येत आहेत. दस्तुरी येथील वाहनतळ गाड्यांनी फुल्ल झाले आहे. त्यामुळे या मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

घाटरस्त्यात गेले पाच दिवस दररोज वाहतूक कोंडी होत आहे. प्रवासी टॅक्सीमधून माथेरानमध्ये येत असलेल्या पर्यटकांना नाईलाजाने घाटरस्त्यात खाली उतरावे लागत आहे. दोन किंवा तीन वळणांचा चढाव चढून जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. महिला पर्यटक आणि लहान मुलांना याचा अधिक त्रास होत आहे. प्रशासनाने याबाबत ठोस उपाययोजना करण्याची मागणी पर्यटक करीत आहेत.


**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल,
पिनकोड - ४१० २०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ११९ ( ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप - या निविदेमध्ये एकूण ७ कामे समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १८.११.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक २५.११.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.
www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-१७.११.२०२३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल



**पेपर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **प्रबळ अंबरनाथ मढवी** यांचेकडून उदय अनंत तायशेटे, भुषण उदय तायशेटे कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **प्रबळ अंबरनाथ मढवी** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे: विंधणे (५५३३२४)**
(ULPIN 36873233908), **तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २७०/३ | १ | ०.३२.५०<br>पो.ख. ०.००.०० | ३.२५ |
| | | **एकुण ०.३२.५०** | |

**या एकुण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.१६.५० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १८ नोव्हेंबर २०२३

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस., भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



**Re-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000029119** Tender No.: **EE/EHV(O&M)/DN/PNL/Re-e-Tender-55/ 2023-2024.** RFx Re-e-tender for work of AMC for weed control in Substation switchyard premises and pest control in control room building premises at various substations under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited Rs. 24.50/- Lakhs, EMD amount Rs. 24,500/-** |
| 2. | Online Downloading theRFx . | **20.11.2023, 18:00 Hrs. to 27.11.2023, 23:59 Hrs.** |
| 3. | Online Submission of the Rfx | **On or Before 27.11.2023 up to 23:59 Hrs.** |
| 3. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.11.2023 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in** Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410. **Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN PANVEL**



**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-34/23-24 7000028438** | Work of Installation and commissioning of Tap Changer Controller cum Transformer Monitoring Units alongwith HMIT & Software at 100kV Dombivali substation under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 64.39 Lakhs** |
| **Tend-36/23-24 7000029023** | Supply of Hydraulic Crimping Machine with petrol engine drive and die set of different size to EHV Lines S/Dn. Dombivali and line S/Dn. Padghe under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 9.86 Lakhs** |
| **Tend-38/23-24 7000029012** | Work of damaged cable of 100kV Godrej - I line in Godrej company premises under EHV Lines S/Dn. Panvel - I EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 32.55 Lakhs** |
| **Tend-42/23-24 7000028787** | AMC for routine maintenance of Nitrogen injection fire protection system (NIFPS) including replacement of faulty spares at various substation under Panvel circle. | **Rs. 25.00 Lakhs** |

**EMD 1% of estimated cost, Submission of bids from 17.11.2023 to 24.11.2023 at 11:00 hrs, Opening date: 24.11.2023 at 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** each tender. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer(Adm) **Tel No. 022-27459624**, Mob. No. **9769006131**. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000029123** Tender No.: **EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-53/ 2023-2024.** RFx e-tender for AMC for various regular preventative maintenance/emergency and breakdown works of various 220kV & 100kV Substations under EHV O&M Dn. Panvel. **Tender amount Limited to Rs. 20,00,000/-, EMD amount Rs. 20,000/-** |
| 2. | Online Downloading theRFx . | **20.11.2023, 18:00 Hrs. to 27.11.2023, 23:59 Hrs.** |
| 3. | Online Submission of the Rfx | **On or Before 27.11.2023 up to 23:59 Hrs.** |
| 3. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.11.2023 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in** Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410. **Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN PANVEL**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली स्थावर मिळकत आमचे अशिल **१) श्री. सुमन परितोश मोन्डल आणि २) सौ. कल्पना परितोश मोन्डल** यांनी सदर स्थावर मिळकतीचा खरेदी करण्याचे ठरविले आहे. परंतु सदरहू स्थावर मिळकत ही **१) श्री. जगदीश हरिराम पाल आणि २) सौ. सावित्री जगदीश पाल** यांनी **मे. आस्था डेव्हलपर्स** यांचेकडून विकत घेतली होती. परंतु, **१) श्री. जगदीश हरिराम पाल हे दिनांक ०३/०५/२०२१ रोजी आणि २) सौ. सावित्री जगदीश पाल या दिनांक ३०/०५/२०२२** रोजी मयत झाले आहेत व सदरहू **१) श्री. विनय जगदीश पाल आणि २) श्री. विवेक जगदीश पाल हे १) श्री. जगदीश हरिराम पाल आणि २) सौ. सावित्री जगदीश पाल** यांचे कायदेशीर वारस आहेत व त्यांनी सदरहू सदनिका विक्रीस काढली असून आमचे अशिलांनी सदरहू सदनिका **१) श्री. विनय जगदीश पाल आणि २) श्री. विवेक जगदीश पाल** यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तसेच कोणाचा काही ताबाकब्जा किंवा काही अधिकार असल्यास कळविण्याकरीता जाहीर नोटीस प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे.

**: मिळकतीचे वर्णन :**

**सदनिका/फ्लॅट नं. २०४, दुसरा मजला, क्षेत्र २७.६८ चौ.मी बिल्टअप क्षेत्र, इमारतीचे नाव ''आस्था अपार्टमेंट'' नोंदणीकृत सोसायटी ''आस्था अपार्टमेंट को.ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड'', गावठाण प्लॉट नं. ११४, सेक्टर-१४, कामोठे जीइएस, नवी मुंबई, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल महानगरपालिका हद्दीतील व सब रजिस्ट्रार साहेब पनवेल, जि. रायगड यांचे अधिकार क्षेत्रातील स्थावर मिळकत.**

सदरहू स्थावर मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, एम.ओ.यू, साठेकरार, वारसाहक्क, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, विकास करार, भूधारक हक्क, मृत्यूपत्र, लीज/भाडेपट्टा, लीन, पोटगी हक्क अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर स्थावर मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व आमचे अशिल सदर मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल,
दि.-१७/११/२०२३

**सही/-**
**(सतिश बाळाराम गवते)**
**वकील**

पत्ता : ऑफिस नं. १४, यशोकिरण को.ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. फोन नं. ९१३७५००४५१

# निवडक

## ब्राह्मण सभेचा संगीतमय दीपोत्सव



**पनवेल** : ब्राह्मण सभा, नवीन पनवेलचा दीपोत्सवी कार्यक्रम नुकताच पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडला. या कार्यक्रमाच्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन होत असताना दीपस्तुती, रामाची आरती, गणेश अष्टक आणि मधुराष्टक यांचे गायन संस्थेच्या पौरोहित्य ग्रुपतर्फे करण्यात आले. दीपप्रज्ज्वलनानंतर ब्राह्मण सभेचे त्रैमासिक असलेल्या मंत्रपुष्पचे प्रकाशन ब्राह्मण सभेच्या अध्यक्ष दीपाली जोशी, सचिव मंजुषा भावे आणि मंत्रपुष्पचे संपादक शेखर अंबेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ब्राह्मण सभेच्या साहित्य साधना चमूतर्फे कविता वाचन, नृत्य आराधना चमूतर्फे विविध नृत्याविष्कार तर स्वराधना चमूतर्फे मराठी आणि हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर पु. ल. देशपांडे यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातील एक प्रवेश सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे निवेदन मुग्धा अंबेकर आणि सानिका केळकर यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीपाद वैशंपायन यांनी तर पसायदान रेणुका दलाल आणि डॉ. शिल्पा वैशंपायन यांनी सादर केले.

## रिक्षाचालकांना गणवेशाचे वाटप

**नवी मुंबई** : शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या मार्गदर्शनाखाली शिववाहतूक सेवेच्या माध्यमातून



दिलीप आमले यांच्या वतीने रिक्षाचालकांना गणवेश वाटप शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त नेरूळ येथे करण्यात आले. या वेळी संगिता आमले, संगिता दाते, कलावती गर्जे, अर्जुन डुकरे, उत्तम अबावडे, मधुकर धुमाळ, पद्माकर रेणके, गणेश पाल व शिवसैनिक उपस्थित होते.

# वाहतूक नियम तोडणाऱ्यांवर कळंबोली पोलिसांची कारवाई

## दहा महिन्यांत तब्बल एक कोटी २२ लाखांचा दंड वसूल

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीत वाहतूक नियम ढाब्यावर बसवून प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. नियम मोडणाऱ्या चालकांवर वाहतूक विभागाने कारवाई केली आहे. जानेवारी ते ऑक्टोबर या १० महिन्यांत केलेल्या कारवाईतून तब्बल एक कोटी २२ लाख दोन हजार ५०० रुपयाचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती कळंबोलीतील वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांनी दिली.

अपघात टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून वारंवर नियम पाळण्याचे आवाहन करण्यात येते, मात्र त्याकडे नागरिकांनी दुर्लक्ष होत आहे. कळंबोली शहरासह लोखंड-पोलाद बाजार, सायन-पनवेल महामार्ग, कामोठा वसाहतीमधून क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक, ट्रिपल सीट, विनासीटबेल्ट, नो पार्किंग, तसेच रस्त्यावर वाहन उभे केल्याने वाहतुकीस धोका निर्माण होत असल्याने अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांच्या वतीने कारवाई करण्यात आली आहे. १० महिन्यांत हजारोंच्यावर वाहनचालकांवर कारवाई केली आहे.

> **वाहन चालवताना, हेल्मेट न घालने, सीटबेल्ट न लावणे, वाहनाचा विमा, वेगात वाहन चालविणे, परवाना नसणारी वाहने चालवणे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक, नो एन्ट्रीत वाहन चालवणे, कर्कश हॉर्न वाजवणे, सिग्नल जम्पिंग आदींवर प्रामुख्याने कारवाई करण्यात आली.**
>
> **-हरिभाऊ बानकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कळंबोली वाहतूक शाखा**



## ऐरालीत पोलिसांनी चोराला रंगेहात पकडले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ऐरोली सेक्टर ६ येथे एका इलेक्ट्रॉनिक्स दुकानाचे शटर उचकटून एका चोरट्याने आत प्रवेश केला, मात्र याबाबत नागरिकांनी पोलिसांना माहिती देताच तेही तातडीने घटनास्थळी पोहचले व चोराला रंगेहात पकडले.

ऐरोली सेक्टर ६ येथे निखिल जैन यांचे यश नावाचे इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान आहे. सकाळी दुकान उघडण्यापूर्वी माल वाहतूक करणारा टेम्पोचालक आणि अन्य कर्मचारी आले होते. त्यांना दुकानाचे शटर उचकटल्याचे आढळून येताच त्यांनी पाहणी केली. त्या वेळी आतमध्ये एक अनोळखी व्यक्ती असल्याचे आढळून आले.

त्यांनी तत्काळ पोलीस आणि जैन यांना फोन करून ही माहिती दिली. जैन येण्यापूर्वीच पोलिसांनी आत असलेल्या व्यक्तीला ताब्यात घेतले होते. त्याची चौकशी केली असता फिरोज अहमद शेख असे त्याचे नाव असल्याचे समोर आले.

तो मुंबईत मोहम्मद अली रस्त्याशेजारील झोपडपट्टीत राहणारा असून हमाली करतो असेही समोर आले. त्याने दुकानाचे शटर उचकटून आतील ५० हजारांची चोरलेली रोकड जप्त करण्यात आली असून त्याला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला.

## कळंबोली येथे मृतदेह आढळला

**पनवेल** : कळंबोली रेल्वे स्टेशनदरम्यान एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध रेल्वे पोलीस करीत आहेत.

मृत व्यक्तीचे अंदाजे वय ५० वर्ष, अंगाने मध्यम, चेहरा गोल, केस काळे पांढरे वाढलेले, दाढी मध्यम वाढलेली, उजव्या हाताच्या पोटरीवर ज्योती दत्ता पवार असे मराठीमध्ये गोंदलेले आहे. त्याने अंगात गुलाबी रंगाचा फूल शर्ट त्यावर काळे ठिपके, आत लाल रंगाचा बनियान, नेसणीस निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा उपनिरीक्षक डी. व्ही. हगवणे यांच्याशी संपर्क साधावा.

## सुल्झर पंप्स कंपनीतील कामगारांना बोनससह सोन्याचे नाणेही भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

सुल्झर पंप्स इंडिया प्रा. ली. या कंपनीतील कामगारांना एक लाखांच्यावर बोनस देण्यात आला आहे. त्याचबरोबर २४ कॅरेटचे सोन्याचे नाणे देण्यात आले. त्यामुळे कामगारांनी दिवाळी जल्लोषात साजरी करून सुल्झर पंप्स व्यवस्थापनाचे आभार मानले आणि युनियन कमिटीचे अभिनंदन केले आहे. सुल्झर पंप्स इंडिया प्रा. लि. ही एक नावाजलेली बहुराष्ट्रीय कंपनी असून या कंपनीमध्ये सुल्झर पंप्स एम्प्लॉईस युनियन ही अंतर्गत कामगार संघटना कार्यरत आहे. कमिटीने गेल्या वर्षी ९ ऑगस्ट २०२२ रोजी कामगारांच्या पगारवाढीचा (२८००० रुपये) व बोनसचा त्रैवार्षिक करार केला होता.

त्या अनुषंगाने सुल्झरच्या कामगारांना दिवाळीच्या अगोदरच बोनस दिला गेला.

२०२२ सालचा या वर्षी दिल्या गेलेल्या बोनसची रक्कम कमाल १,२०,००० रुपये आहे व सरासरी बोनस एक लाखांहून अधिक आहे. कंपनीने कामगारांना बोनसही दिवाळीच्या अगोदर दिला.



## दिवाळीत नवी मुंबईत प्रदूषणाचे मीटर वाढले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाढत्या प्रदूषणाचा विषय ऐरणीवर आला आहे. शासन याबाबत उपाययोजनांवर भर देत आहे. न्यायालयानेदेखील फटाके फोडण्यासाठी वेळेचे निर्बंध लादले होते, मात्र दिवाळीच्या दोन-तीन दिवसांत प्रदूषणाचे मीटर २००च्या पुढे गेले आहे.



एकंदरीत दिवाळीच्या आतिषबाजीनंतर आणि हवेत जमलेल्या सूक्ष्म धुळीच्या कणातून, त्यात हवेतील दमटता, प्रदूषणकारी कारखाने, वाढणारी वाहतूक त्यात सर्वांत मोठी भर टाकणारा बांधकामाचा वेग यामुळे प्रदूषण कमी करणे आता कठीण होत असल्याचे दिसून येत आहे. त्यात कळंबोलीस्थित प्रदूषण नियंत्रण मंडळाने बसविलेल्या एअर क्वालिटी इंडेक्स मशीन यंत्रणाच बंद असल्याने याठिकाणचे प्रदूषणाचे मोजमाप होऊ शकले नाही. चार दिवसांपूर्वी याच मशीनवर प्रदूषणाचा इंडेक्स ३००च्या पुढे दाखविण्यात येत होते. सध्या ही यंत्रणा नादुरुस्त किंवा एनए असल्याची दाखवत आहे.

पनवेल शहरासह नवी मुंबईमधील नेरुळ १६७, महापे १५४, कोपरी पाडा (वाशी) २५०, सानपाडा २०४, तळोजा एमआयडीसीमधील तोंडरे याठिकाणी बसविलेल्या यंत्रणेत एअर क्वालिटी इंडेक्स २०२ दाखविण्यात आला. त्यामुळे हवेची गुणवत्ता अजूनच खालावली आहे.

## नवी मुंबईतील बोनकोडे गावात सिलिंडरचा स्फोट

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील बोनकोडे गावातील मयुरेश नावाच्या इमारतीत घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. त्यामुळे तातडीने रातोरात इमारत रिकामी करण्यात आली.



बोनकोडे गावात मयुरेश नावाची इमारत होती. या इमारतीत तळमजल्यावर एक बंद गाळा होता. येथे भंगार साहित्य ठेवले जात होते. गुरुवारी रात्री १०.३० वा. च्या सुमारास याच भंगार सामानात ठेवलेल्या गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. या स्फोटाच्या आवाजाने परिसरात खळबळ उडाली होती.

याबाबत महिती मिळताच विभाग कार्यालयातील अधिकारी, पोलीस तसेच अग्निशमन दल पोहचले होते. या घटनेत कुठलीही जीवितहानी अथवा कोणी जखमी झाले नाही. स्फोट नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरू आहे.

## पनवेल शहरामध्ये टोईंग व्हॅन पुन्हा सुरू करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरात गेल्या काही दिवसांपासून टोईंग व्हॅन बंद असल्याने अस्ताव्यस्त वाहने उभी करण्यात येत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी असून नवीन पनवेलसह पनवेलकर हैराण झाले आहेत. त्यामुळे पनवेल शहर वाहतूक शाखेकडून टोईंग व्हॅन पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात येत आहे.

पनवेलमध्ये मोठमोठी दुकाने, मॉल्स उभे राहिले असून या ठिकाणी खरेदीसाठी मोठ्या संख्येने ग्राहक येतात. कापड आणि झवेरी बाजारात सतत वर्दळ असते. याव्यतिरिक्त नगरपालिका व इतर शासकिय कार्यालय या ठिकाणी आहेत. त्यामुळे तालुक्यातून लोक पनवेलला येतात. शहरात सद्यस्थितीतही बहुसंख्य सोसायट्यांमध्ये पार्किंगची सुविधाच नाही. काही सोसायट्यांना पार्किंगची सोयच नसल्यामुळे येथील रहिवाशी आपली वाहने रस्त्यावर लावतात. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर सातत्याने वाहतुक कोंडी होत असून त्याचा त्रास पनवेलकरांना होत आहे. त्यामुळे नवीन पनवेलसह पनवेल शहरात सम-विषम पार्किंग सुरू करण्यात आली आहे.

वाहतूक शाखेकडून नवीन पनवेल तसेच पनवेल शहराकरिता याकरीता खास टोईंग व्हॅन सुरू करण्यात आली आहे. जे वाहन चालक सम-विषम तारखेला नियमानुसार पार्किंग करणार नाहीत त्याचबरोबर नो पार्किंग क्षेत्रात वाहने उभे केले तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होत होती, मात्र गेल्या काही दिवसांपासून ही कारवाई थंडावली आहे. त्यामुळे शहरात पुन्हा वाहतूक कोंडी होत आहे. यामुळेच वाहतूक पोलिसांनी पुन्हा टाईंग व्हॅन सुरू करण्याची मागणी होत आहे.

## नील हॉस्पिटल येथे दिवाळी कार्यक्रम उत्साहात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

डिवाईन संस्कार रिसर्च फाउंडेशन, नील हॉस्पिटल व ब्रह्मा कुमारिज यांच्यामार्फत नील हॉस्पिटल येथे दिवाळी कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, श्वेता संतोष शेट्टी, मंगला कृष्णराव गडमुळे, बीके डॉ. शुभदा नील व इतर मान्यवर उपस्थत होते.

प्रसिद्ध स्त्रीरोग व गर्भसंस्कार तज्ज्ञ ब्रह्माकुमारी डॉ. शुभदा नील यांनी दिवाळीचे आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगितले. ताणतणाव कमी करण्यासाठी रोज मेडिटेशनद्वारे परमपिता परमात्म्याच्या आठवणीने शांत, खुश व शक्तिशाली राहणे ही काळाची गरज आहे, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

उपस्थित मान्यवरांचा ब्रह्मा कुमारिजतर्फे लक्ष्मी नारायणाची प्रतिमा देवून सत्कार करण्यात आला.



## गायक राहुल देशपांडे यांच्यासोबत सुरमयी दिवाळी पहाट

**पनवेल : वार्ताहर**

मुंबईतील प्रथितयश व आघाडीचे विकसक सुगी डेव्हलपर्स यांच्या सुगी परिवाराने दादर बीचवर आयोजित केलेल्या प्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांच्या पहाट संस्मरणीय केली. छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील पार्क क्लब येथे दादरकरांच्या अभूतपूर्व प्रतिसादाने रंगलेल्या या मैफिलीत राहुल देशपांडे यांनी सादर केलेल्या सुरावटींनी रसिकांची दिवाळी पहाट सुरमयी झाली.

गायक राहुल देशपांडे यांनी पहाटेच्या वेळी गायल्या जाणाऱ्या रागाने सुरूवात करीत सूर छेडले व त्यावर कडी करीत अहिर भैरव रागातील 'अलबेला सजन आयो रे' तसेच 'तुज मागतो मी आता', 'देव देव्हाऱ्यात नाही' इत्यादी भक्तीगीते, नाट्यगीते व भावगीते यांची पेशकश करीत 'कानडा राजा पंढरीचा' या भक्तीगीताने वातावरण विठ्ठलमय केले.

गायिका आर्या आंबेकर हिनेही आपल्या सुमधुर स्वरांनी राहुल देशपांडे यांना उत्तम साथ देत काही गाणी सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी रंगभूमीवरील अभिनेते आणि 'संकर्षण व्हाया स्पृहा' या त्यांच्या सुप्रसिद्ध कविता कार्यक्रमासाठी प्रसिद्ध असलेले कवी संकर्षण कऱ्हाडे यांनी केले. प्रेक्षकांना दिवाळी पहाटच्या शुभेच्छा देताना, सुगी ग्रुपचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय भागीदार निशांत देशमुख म्हणाले, सुगी परिवाराच्या या मैफिलीने मुंबईकरांना दिवाळी अनोख्या पद्धतीने साजरी करण्यासाठी सर्वोत्तम सांस्कृतिक मेजवानी दिली. आपली संस्कृती, परंपरा आणि वारसा जतन करण्यासाठी सुगी परिवार नेहमीच प्रयत्नशील असतो, जेणेकरून सांस्कृतिकदृष्ट्या एक समृद्ध समाज निर्माण होईल. आम्ही मुंबईतील आणि विशेषतः दादरमधील सर्व वयोगटातील नागरिकांमध्ये आमच्या सुगी परिवाराचे एक विस्तारित कुटुंब म्हणून या मैफिलीच्या निमित्ताने आनंद वाटण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमात लहान मुलेही आपल्या पालकांसोबत तितक्याच उत्साहाने सहभागी झाल्याने आपल्या समृद्ध सांस्कृतिक मूल्यांचा पुढच्या पिढीवर संस्कार करण्याकामी या उपक्रमाचा नक्कीच फायदा होईल.







## कामोठ्यात आजपासून आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय तसेच झेंडा सामाजिक संस्थेतर्फे आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १८ ते २७ नोव्हेंबरदरम्यान हा महोत्सव कामोठे से. ११चे, नालंदा बुद्धविहाराच्या बाजूला असणाऱ्या मैदानावर रंगणार आहे.

महोत्सवाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी सायंकाळी ६.३० वा. होणार असून या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल मनपाचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महोत्सवाचे आयोजन संस्थेचे संस्थापक अशोक राघो पावणेकर व अध्यक्ष ॲड. जय रामदास पावणेकर यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

महोत्सवामध्ये दिलखेच लावणी, सोलो डान्स/कामोठे आयडॉल, हभप. वनीताताई पाटील यांचे किर्तन, ब्रास बँड महोत्सव, ग्रुप डान्स स्पर्धा, कामोठे श्री, मिस कामोठे, धमाल कोळीगीते, महाराष्ट्राची लोकधारा अशा विविध कार्यक्रमांसह आगरी-कराडी पद्धतीच्या विविध खाद्यपदार्थांची मेजवानी असणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या महोत्सवाचा आस्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## उमेश चौधरी यांच्या भक्तीगीतांचे आकाशवाणीवर प्रसारण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२२ वर्षांच्या संगीत साधनेच्या कालावधीत आपल्या अथक साधनेने गायन कलेवर प्रभूत्व निर्माण करणारे उमेश चौधरी यांच्या भक्तीगीत गायन कार्यक्रमाचे प्रसारण शनिवारी (दि. १८) सकाळी ७.३० वा. आकाशवाणीच्या मुंबई अस्मिता वाहिनीवर होणार आहे.

खारघर नवी मुंबई येथील उमेश चौधरी यांना संगीत साधना करता करता समाजाने अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. अतिशय विनम्र, साधासरळ आणि इतरांना मदत करायला तत्पर असलेल्या आणि स्वरसाधनेत रमलेल्या या कलाकाराने तळागळात संगीत सेवा वृद्धिंगत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरूच ठेवला आहे. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची 'संगीत विशारद' ही पदवी प्राप्त असलेले उमेश चौधरी यांनी जयपूर अत्रौली घराण्याचे उस्ताद अस्लम खान यांच्याकडे तब्बल १० वर्ष शास्त्रीय संगीताची तालीम घेतली असून आता ते पं. शुभदा पराडकर यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे मार्गदर्शन घेत आहेत.



आकाशवाणीवर उमेश चौधरी यांचे 'आजि दिवाळी दसरा', 'हरी हरी आत हरी', रे मज भुलविले वेणुनादे' या भक्तीगीतांचे रेकॉर्डींग झाले असून त्याचे प्रसारण मुंबई अस्मिता आकाशवाहिनीवर शनिवारी होणार आहे आणि हि बाब निश्चितच रायगड नवी मुंबईकरांसाठी अभिमानाची आहे.

# मनोज जरांगे-पाटील यांच्या खोपोलीतील सभेची तयारी

## नियोजनासंदर्भात कर्जत येथे मराठा समाजाची बैठक



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

आरक्षणासाठी लढा देणारे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या सभेचे आयोजन २० नोव्हेंबर रोजी खोपोली येथे करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नियोजन करण्यासाठी कर्जत तालुक्यातील मराठा समाजाच्या वतीने येथील रॉयल गार्डनच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक विनोद साबळे, माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, राजेश लाड, राम राणे, मधुकर घारे, अनिल भोसले, दत्तात्रेय पिंपरकर, अशोक सावंत, प्रकाश पालकर, संदीप भोईर, जयेंद्र देशमुख, शिवाजी भासे, उदय पाटील, राजेश जाधव, अनिल कडू, कृष्णा घाडगे, संतोष पाटील, हेमंत ठाणगे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

राजेश लाड यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात मराठा आरक्षणासाठी लढा सुरू आहे. तो यशस्वी होण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे, असे स्पष्ट केले. उदय पाटील यांनी, मराठा आरक्षण देण्यासाठी सरकारने नोंदी तपासणीचे काम सुरू केले आहे. आपल्या कार्यकर्त्यांनी तेथे जातीने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. असे सूचित केले. शंकर थोरवे यांनी, आपल्या आंदोलनाकडे अधिकारीवर्ग गांभिर्याने पाहत नाही त्याबद्दल तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. दत्तात्रेय पिंपरकर यांनी, मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळण्यासाठी आपण लढा देत आहोत, असे सांगितले.

विनोद साबळे म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी आपला लढा सुरू आहे. २० नोव्हेंबर रोजी खोपोली येथे मनोज जरांगे-पाटील यांची जाहीर सभा आहे. ती सभा यशस्वी होण्यासाठी आपण सर्वांनी योगदान देणे गरजेचे आहे. आपण आपल्या हक्काचे आरक्षण मागत आहोत. त्यासाठी गावागावात बैठका घेऊन जास्तीत जास्त मराठा बांधव-भगिनी सभेसाठी कसे उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करावा व योग्य नियोजन करावे.

सुनील पाटील यांनी, मराठा आरक्षणाचा लढा देताना राजकारण बाजूला ठेवून लाड, घारे, थोरवे आदी विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते समाजासाठी एकत्र येत आहेत. ओबीसी समाजाचे एक-दोन नेते वगळता बहुतेकांचा आपल्या लढ्याला पाठिंबा आहे. आपण गावोगाव बैठका घेऊन आपली भूमिका सांगून खोपोलीतील बैठकीसाठी जास्तीत जास्त समाज बंधू-भगिनी कसे उपस्थित राहतील हे पहावे, कारण हा लढा ऐतिहासिक झाला पाहिजे.

मंगेश दळवी यांनी, मराठा आरक्षणासाठी हा दीड महिन्याचा कालावधी आहे. त्यासाठी आताच आपण सर्व ताकदीनिशी प्रयत्न करावा, असे आवाहन केले. रमेश कदम, रमेश शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार प्रदर्शन कैलास म्हामले यांनी मानले.

## महाडच्या सभेला 'उबाठा'कडून राजकीय रंग



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे १८ व १९ नोव्हेंबर रोजी किल्ले रायगड व महाड ठिकाणी येत आहेत. त्यांच्या महाड येथील स्वागत सभेस उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने राजकीय रंग दिला आहे.

महाड सकल मराठा वतीने गुरुवारी विरेश्वर मंदिर येथे मनोज जरांगे-पाटील यांच्या स्वागत सभेच्या तयारीसंदर्भात पत्रकार परिषद घेण्यात आली. जरांगे-पाटील १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी किल्ले रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी येणार आहेत. दरम्यान, महाड सकल मराठा समाजाच्या वतीने त्यांना विनंती करून १९ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक महाड येथे त्यांची स्वागत सभा होणार आहे, मात्र कोकणातून कुणबी प्रमाणपत्र घेण्यास होणारा विरोध पाहता पत्रकारांनी आयोजकांना या प्रकरणी प्रश्न विचारला तसेच आयोजकांमध्ये उबाठा गटाचा चेहरा दिसत असून सर्व राजकीय पक्ष यात सहभागी का नाही, असाही प्रश्न विचारला. उबाठावाल्यांनी पत्रकार परिषद आटोपती घेतली.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात नवजात शिशु सप्ताहाचे उद्‌घाटन



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील रायगड जिल्हा सामान्य रुग्णालयातील प्रसुती व नवजात बालक कक्षाच्या माध्यमातून राष्ट्रीय नवजात शिशु सप्ताह कार्यक्रम १५ ते २१ नोव्हेंबर या कालावधीकरिता साजरा करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात १६ नोव्हेंबर रोजी जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या हस्ते उद्‌घाटन करून करण्यात आले.

या कार्यक्रमाचे घोषवाक्य आरोग्य संस्था व समुदायाद्वारे नवजात शिशूंचे पालनपोषण आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा नवजात मृत्यू दरमहा एक संख्येवर आणणे, नवजात शिशुंना देण्यात येणाऱ्या आरोग्यसेवा (आरोग्य संस्थास्तरीय व सामाजिकस्तरीय) यावर विशेष भर देणे, नवजात शिशुंना देण्यात येणाऱ्या आरोग्यसेवेविषयी समाजामध्ये जनजागृती करणे असा आहे.

या कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल घुगे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष मिश्रा, डॉ. आशिष पाटील, एसएनसीयु विभाग प्रभा तारी, सहाय्यक अधिसेविका तसेच बालरोगतज्ज्ञ, परिचारिका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका अस्मिता चव्हाण, परीसेविका, मुकादम, आशा कार्यकर्ती, रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

## ताडी दुकानांचा ४ डिसेंबरला ई-लिलाव

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ७८ ताडी दुकानांचा सन २०२३-२४ या वर्षातील जाहीर लिलाव (ई-लिलाव-नि-निविदा) पद्धतीने दिनांक ४ डिसेंबर २०२३ रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर घेण्यात येणार आहे. ई-लिलावाच्या अटी व शर्ती तसेच प्रक्रियेबाबत अधिक माहिती संकेतस्थळावर तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग व सर्व विभागीय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सर्व संबंधितानी याबाबत नोंद घ्यावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभाग जिल्हा अधीक्षक आर. आर. कोले यांनी केले आहे.

## विकसित भारत संकल्प यात्रा; आरसीएफ थळ प्रकल्पात कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांचे लाभ लक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहचावेत या उद्देशाने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम केंद्र शासनाकडून राबविण्यात येत आहे. आरसीएफ थळ प्रकल्पातदेखील या मोहिमेंतर्गत कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेचे उद्‌घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी (दि. १५) झारखंडमधील खूंटी जिल्ह्यात आदिवासी गौरव दिनाचे औचित्य साधून करण्यात आले. ही मोहीम भारत सरकार अंतर्गत येणाऱ्या विविध मंत्रालयांमार्फत राबविण्यात येत असून माहिती व प्रसारण मंत्रालय, कृषी मंत्रालय व उर्वरक विभाग यांच्या विशेष सहभागातून होत आहे. या उपक्रमाची सुरुवात भारतातील सर्व आदिवासी जिल्ह्यातून करण्यात आली असून २४ जानेवारी २०२४पर्यंत हा उपक्रम देशभर राबवला जाणार आहे. आरसीएफ थळ प्रकल्पातदेखील या मोहिमेंतर्गत कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

विकसित भारत संकल्प यात्रा मोहिमेचा उद्देश केंद्र सरकारद्वारे राबविण्यात येत असणारया विविध लोकाभिमुख योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचवणे आहे. याबरोबरच कृषी क्षेत्रात अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे नॅनो युरिया, नॅनो डीएपी आणि अन्य सूक्ष्म पोषक खतांची फवारणीबरोबर खतांचा संतुलित वापर यासंबंधी महत्त्वपूर्ण माहिती देण्यात येत आहे.

## खोपोलीत संगीतमय कार्यक्रमास प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवाळी सणानिमित्त ब्राह्मण सभा खोपोली या संस्थेतर्फे बिवरे सभागृहात दिवाळी पहाट या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

स्वरलंकार प्रस्तुत स्वरमाधुरी या संगीतमय कार्यक्रमात जुन्या नव्या गीतांचे सादरीकरण करण्यात आले. टाळ्यांचा कडकडाट व वन्स मोअरच्या मागणीने कलाकारांना उपस्थित श्रोत्यांनी प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाची सुरुवात द्रीपप्रजलनाने करण्यात आली. माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, ज्येष्ठ रंगकर्मी व सामाजिक कार्यकर्ते उल्हासराव देशमुख, माजी नगरसेवक अमोल जाधव, विकसक शिरीष विवरे, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अनिल रानडे तसेच संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते द्विप्रजनन व श्री गणेशाच्या प्रतिमेस पुष्प आहार अर्पण करण्यात आले.

भावगीते, भक्तीगीते तसेच लावणी व इतर लोकसंगीत अविनाश देव, अनुश्री देव, अथर्व देव, चैत्राली देसाई या कलाकारांनी आपल्या सुमधुर आवाजात सादर केले. त्यांना प्रतीक वैते, आशुतोष पोटे व जगदीश पाटील यांनी उत्तम वाद्यसाथ दिली. त्यामुळे ही संगीत मैफिल उत्तरोत्तर उत्तर रंगत गेली. महेश हेलावडे यांचे खुसखुशीत व विनोदी सूत्रसंचालनाने कार्यक्रमात बहार आणली. शेवटी नंदू भट यांच्या आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



## कर्जतमध्ये दीपावली, भाऊबीज उत्साहात



(छाया : जयवंत माडपे)

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात दिवाळीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. भाऊबीजेसाठी बहिणीकडे जाण्यासाठी बंधुराजा आपली वाहने घेऊन निघाल्याने चारफाट्यावर दिवसभर वाहतूक कोंडी होती, मात्र वाहतूक पोलिसांनी चोख व्यवस्था ठेवल्याने मंद गतीने वाहतूक सुरू होती.

दिवाळी पाडव्याच्या दिवशी शेतकऱ्यांनी आपली गुरे रंगवून सकाळी गावातील रस्त्यावर पेंढा आडवा टाकून पेटविला व त्यावरून ही गुरे उडवली, तर सायंकाळच्या सुमारास चिमुरड्यांसह युवकांनीही फटाक्यांची एकच आतषबाजी केली.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या कर्जतमधील जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन



**कर्जत : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार समर्थकांना पक्ष कार्यालय कर्जत शहरात नव्हते. एक सुसज्ज कार्यालय उभारून त्याचे उदघाटन करण्यात आले. या वेळी कर्जत, खालापूर तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष सुधाकर घारे आणि कर्जत शहर अध्यक्ष भगवान भोईर यांनी कर्जत-मुरबाड रोडनजीक राष्ट्रवादी काँग्रेसचे सुसज्ज जनसंपर्क कार्यालय उभारले आहे. या कार्यालयात सर्व विभागांच्या अध्यक्षांसाठी स्वतंत्र दालन, सभागृह, वॉर रूम असून सर्वच विभाग संगणकाने जोडले आहेत.

या कार्यालयाचे उद्‌घाटन ९८ वर्षांचे ज्येष्ठ कार्यकर्ते वि. रा. देशमुख यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या कार्यक्रमास प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, प्रदेश प्रतिनिधी तथा कर्जत शहर अध्यक्ष भगवान भोईर, भरत भगत, उल्हास भुर्के, जिल्हा युवक अध्यक्ष अंकित साखरे, तालुका महिला अध्यक्ष ॲड. रंजना धुळे, तालुका युवक अध्यक्ष स्वप्नील पालकर, शहर युवक अध्यक्ष सोमनाथ पालकर, शहर कार्याध्यक्ष राजाभाऊ कोठारी आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना सुधाकर घारे यांनी, तालुक्यातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी हे जनसंपर्क कार्यालय असून जनतेने येथे यवून आपल्या समस्या मांडाव्यात. त्या सोडविण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करू, असे स्पष्ट केले.

या कार्यक्रमास दीपक श्रीखंडे, शरद कदम, राम कोळंबे, नारायण भोईर, नगरसेविका भारती पालकर, मधुरा चंदन, मधुकर घारे, प्रवीण देशमुख, अनिल कडू, जनार्दन कोळंबे, प्रमोद देशमुख, विनय वेखंडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहाबाज येथील भैरवनाथ मंदिरात दीपोत्सव साजरा



(छाया : जितू शिगवण)

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील भैरवनाथ मंदिरात दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने मंदिरात दीपोत्सव साजरा करण्यात आला. मंदिर आणि परिसरात एक हजार १११ दिवे प्रज्वलित करण्यात आल्याने दिव्यांच्या प्रकाशात मंदिर परिसर न्हाऊन निघाला.

शिवभैरव भजन मंडळ गेली आठ वर्षे हा उपक्रम राबवत आहे. मंदिर परिसरात दिव्यांची आरास करण्यात आली होती. या वेळी शोभेच्या फटाक्यांची आतषबाजीही करण्यात आली. या रोषणाईचे समोरच्या तलावात पडणारे प्रतिबिंब त्याचे सौंदर्य अधिकच खुलवत होते. डोळ्यांचे पारणे फेडणारा हा दीपोत्सव अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

यानिमित्ताने सचिन धुमाळ म्युझिकल ॲकॅडमी प्रस्तुत बासरी आणि मृदुंग वादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्‌घाटन गजानन नाम सप्ताह शहाबाजचे अध्यक्ष नितीन पाटील यांनी श्रीफळ वाढवून केले. बालकलाकारांच्या या संगीत मैफलीचा आस्वाद पंचक्रोशीतील नागरिक आणि रसिकांनी घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुयोग जुईकर आणि निमीष जुईकर यांचे मोलाचे योगदान लाभले.

## लोणशी ग्रामपंचायत सरपंचपदाचा सिद्धेश पालकरांनी स्वीकारला पदभार

### उपसरपंचपदी मुन्नवर येश्वीकर बिनविरोध



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणशी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदभार सिद्धेश शांताराम पालकर यांनी स्वीकारला असून उपसरपंचपदी मुन्नवर कासीम येश्वीकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

लोणशीच्या सरपंचपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सिद्धेश पालकर दणदणीत मतांनी निवडून येऊन ग्रामपंचायतीच्या सर्व म्हणजे १० जागांवर राष्ट्रवादीचे सदस्य निवडून आले आहेत. त्यानंतर उपसरपंचपदाची निवडणूक ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी तथा माणगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी महेंद्र गायकवाड यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

उपसरपंचपदासाठी मुन्नवर कासीम येश्वीकर यांचा एकमेव सर्ज असल्याने ते बिनविरोध निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी गायकवाड यांनी जाहीर केले.

# शब्द संवाद दिवाळी अंकाचे प्रकाशन

**महाड : प्रतिनिधी**

महाड येथील पत्रकार निलेश पवार यांनी प्रसिद्ध केलेल्या शब्द संवाद या दिवाळी अंकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकणे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास महाड पत्रकार संघाचे सदस्य उपस्थित होते.

मोबाईलच्या युगात वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. एकेकाळी वाचक दिवाळी अंकांची आतुरतेने वाट पाहत असत, मात्र आजकाल दिवाळी अंक फक्त जाहिरांती पुरतेच मर्यादित राहिले आहेत, अशी खंत महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा शब्द संवाद या दिवाळी अंकाचे संपादक निलेश पवार यांनी अंकाच्या प्रकाशनावेळी व्यक्त केली. या गोष्टीचे भान ठेवून आपण या दिवाळी अंकात विविधांगी साहित्य समाविष्ट केल्याचे पवार यांनी सांगितले.

ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकणे, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष महेश शिंदे यांनी पवार यांचे कौतुक केले. दरम्यान, पत्रकार गोपाळ कांबळे, राजेंद्र जैतपाळ, उदय सावंत यांनीदेखील शुभेच्छा व्यक्त केल्या.



# विश्वचषक स्पर्धेची उद्या अंतिम लढत

## भारत-ऑस्ट्रेलिया २० वर्षांनी आमनेसामने



**मुंबई : प्रतिनिधी**

विश्वचषक स्पर्धेत येत्या रविवारी म्हणजेच १९ नोव्हेंबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम फेरीत भारताचा सामना पाच वेळा चॅम्पियन ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. या विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य फेरीत भारताने न्यूझीलंडचा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली होती, तर दुसऱ्या उपांत्य फेरीत कांगारू संघाने दक्षिण आफ्रिका संघाला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

भारतीय संघ चौथ्यांदा एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचला आहे, तर कांगारू संघाने आठव्यांदा अंतिम फेरी गाठण्याचा मान मिळविला. आता पुढील विश्वविजेते होण्यासाठी दोन्ही संघांमध्ये स्पर्धा असेल, तर दक्षिण आफ्रिका पुन्हा एकदा चोकर असल्याचे सिद्ध झाले. त्यांना विश्वचषकाच्या अंतिम फेरीत आतापर्यंत एकदाही पोहचता आले नाही.

एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात भारतीय संघ अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाशी भिडण्याची ही दुसरी वेळ असेल. यापूर्वी २००३मध्ये दोन्ही संघ आमनेसामने आले होते. त्या सामन्यात टीम इंडियाचा पराभव झाला होता. तेव्हा राहुल द्रविड त्या भारतीय संघाचा खेळाडू होता. आता २० वर्षानंतर राहुल द्रविड भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक आहे. भारतीय भूमीवर एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत दोन्ही संघ विजेतेपदासाठी प्रथमच आमनेसामने येतील. ऑस्ट्रेलियाकडून त्या पराभवाचा बदला घेण्याची भारताकडे आता चांगली संधी आहे. २००३मध्ये झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाचा ऑस्ट्रेलियाकडून १२५ धावांनी पराभव झाला होता.

भारतीय संघाबाबत बोलायचे झाले, तर तो चौथ्यांदा फायनलमध्ये पोहचला आहे. त्यापैकी गेल्या तीन फायनलमध्ये हा संघ दोनदा चॅम्पियन बनला आहे तसेच एकदा पराभूत झाला आहे. भारतीय संघ १९८३मध्ये पहिल्यांदा फायनलमध्ये पोहचला होता आणि चॅम्पियन बनला होता, तर दुसऱ्यांदा हा संघ २००३मध्ये फायनलमध्ये पोहचला होता, पण तिथे कांगारू टीमकडून पराभव पत्करावा लागला होता. यानंतर टीम इंडियाने २०११मध्ये अंतिम फेरी गाठली आणि दुसऱ्यांदा चॅम्पियन होण्याचा मान मिळविला.

आता भारताला तिसऱ्यांदा चॅम्पियन बनण्याची संधी आहे. ऑस्ट्रेलियन संघ आठव्यांदा फायनलमध्ये पोहचला आहे. जर शेवटच्या सात फायनलबद्दल बोलायचे, तर हा संघ पाच वेळा चॅम्पियन बनला आणि दोनदा उपविजेता ठरला आहे. आता अंतिम लढतीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# मिस्टर वर्ल्ड बॉडी बिल्डिंग स्पर्धेत सुभाष पुजारी यांना सुवर्णपदक



**पनवेल, खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

१४वी वर्ल्ड बॉडी बिल्डिंग स्पर्धा दक्षिण कोरियात घेण्यात आली. या स्पर्धेत सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी ८० किलो गटात सुवर्णपदक पटकाविले. यासह मुंबई, महाराष्ट्र पोलीस दलाचे व देशाचे नाव उंचावून भारताचा तिरंगा अभिमानाने फडकविला.

इंडियन बॉडी बिल्डिंग अ‍ॅड फेडरेशनच्या वतीने सुभाष पुजारी यांची भारतीय संघातून निवड करण्यात आली होती. ते या स्पर्धेसाठी दररोज सहा तास मिस्टर ऑलिम्पिया सुनीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत होते. स्पर्धेत ४१ देशातील संघांनी व ४५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

सुभाष पुजारी यांनी आतापर्यंत आठ आंतरराष्ट्रीय पदके जिंकली आहेत. वर्ल्ड बॉडी बिल्डिंग स्पर्धेसाठी त्यांना वर्ल्ड बॉडीबिल्डींगचे सेक्रेटरी चेतन पाठारे, लिगल अ‍ॅडव्हायझर विक्रम रोठे तसेच पत्नी रागिणी पुजारी, खालापूरच्या गॅम्प्रो ड्रिलिंग कंपनीचे संचालक आनंद गुप्ता व विवेक गुप्ता यांचे विशेष सहकार्य लाभले.

या यशाबद्दल पोलीस महासंचालक रजनीश शेठ, डॉ. भूषणकुमार उपाध्याय, विवेक फणसाळकर, हेमंत नगराळे, विनय करगावकर, अप्पर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता, मुंबई शहर पोलीस सहआयुक्त एस जयकुमार, पोलीस सहआयुक्त प्रवीणकुमार पडवळ, पोलीस महानिरीक्षक निसार तांबोळी, पोलीस उपायुक्त राजू भुजबळ यांच्यासह पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी व त्यांचे सहकारी मित्र, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी सुभाष पुजारी यांचे अभिनंदन केले.

# रायगडच्या अमेय पाटील, साईराज जोशीची महाराष्ट्राच्या संभाव्य क्रिकेट संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडच्या अमेय पाटील व साईराज जोशी यांची १६ वर्षांखालील महाराष्ट्रच्या संभाव्य क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे, अशी महिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.





महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेल्या १६ वर्षाखालील मुलांच्या निमंत्रित संघांच्या स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या संघातून खेळताना अमेय पाटील व साईराज जोशी यांनी चांगली कामगिरी केली. त्यामुळे त्यांची महाराष्ट्राचा संभाव्य संघात निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्राच्या संभाव्य संघाचे सराव शिबिर सुरू आहे. यातून विजय मर्चंट करंडक स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा १५ खेळाडूंचा अंतिम संघ निवडण्यात येणार आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते तसेच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

# भारतीय संघ जगात सर्वोत्तम -केन विल्यम्सन

**मुंबई : प्रतिनिधी**

विश्वचषक स्पर्धेत भारताने न्यूझीलंडला ७० धावांनी नमवत अंतिम फेरीत स्थान मिळवले. मोहम्मद शमीने या सामन्यात सात गडी बाद केले आणि विश्वचषक स्पर्धेत तिसऱ्यांदा पाच बळी मिळवण्याची किमया साधली. या पार्श्वभूमीवर बोलताना न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यम्सन याने भारत हा जगातील सर्वोत्तम संघ असल्याचे म्हटले आहे.

विल्यम्सन म्हणाला, शमीची कामगिरी कौतुकास्पद आहे. त्याने कदाचित अर्धे सामने खेळले आहेत, तरीही स्पर्धेत सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तो अव्वल आहे. जगातील सर्वोत्तम गोलंदाजांपैकी तो एक आहे. शमीची गोलंदाजी अद्भूत होती. भारतीय संघ प्रत्येक विभागात दर्जेदार कामगिरी करीत आहे. सध्या भारतीय संघ जगातील सर्वोत्तम संघ आहे आणि त्यांचे सर्व खेळाडू आपली सर्वोत्तम कामगिरी करताना दिसत आहेत.

# सचिनचा शंभर शतकांचा विक्रमही विराट मोडू शकतो

## रवी शास्त्री यांचे मत



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा सर्वाधिक ४९ एकदिवसीय शतकांचा विक्रम तर मोडलाच, पण तो इतक्यातच थांबणार नाही. सचिनचा १०० आंतरराष्ट्रीय शतकांचा विक्रम मोडण्याचीही विराटमध्ये क्षमता असल्याचे मत भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले.

विराटने एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत न्यूझीलंडविरुद्धच्या उपांत्य सामन्यात ११७ धावांची खेळी केली. हे त्याचे ५०वे एकदिवसीय शतक ठरले. एकदिवसीय क्रिकेटमध्ये शतकांचे अर्धशतक पूर्ण करणारा तो पहिला फलंदाज ठरला. यासह विराटने कसोटीत २९ आणि ट्वेन्टी-२०मध्ये एक शतक केले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आता त्याच्या नावे एकूण ८० शतके आहेत.

'सचिन तेंडुलकरने १०० शतके केली, तेव्हा त्याच्या या विक्रमाच्या आसपासही एखादा फलंदाज पोहचेल असा कोणी विचारही केला नसेल, मात्र विराटच्या नावे आता ८० शतके आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याची सर्वाधिक ५० शतके झाली आहेत हे अविश्वसनीय आहे,' असे शास्त्री म्हणाले.

'विराटसारख्या खेळाडूसाठी अशक्य असे काहीच नाही. त्याच्यासारखे महान फलंदाज जेव्हा लयीत असतात आणि शतके करत असतात, तेव्हा ते सहजासहजी थांबत नाहीत. त्यांचा शतकांचा आकडा झटपट वाढत जातो. विराटने पुढील १० डावांमध्ये पाच शतके केली, तर आश्चर्य वाटायला नको. तो क्रिकेटच्या तीनही प्रारूपांत खेळतो. तो आणखी तीन-चार वर्षे तरी खेळेल. या काळात तो किती मोठी मजल मारू शकतो याचा अंदाज बांधणेही अवघड आहे,' असेही शास्त्री यांनी नमूद केले.

# हार्दिक पांड्याच्या करिअरला दुखापतीमुळे पुन्हा ब्रेक!




**मुंबई : प्रतिनिधी**

वर्ल्डकप स्पर्धेनंतर भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळणार आहे आणि पाठोपाठ दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर जाणार आहे, पण या दोन्ही मालिकेला भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या मुकणार आहे. वर्ल्डकप स्पर्धेतील बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात हार्दिकचा पाय मुरगळला होता आणि त्याला स्पर्धेतून माघार घ्यावी लागली. दुखापतीतून सावरूनच हार्दिकने पुन्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केले होते, पण आता पुन्हा त्याच्या करिअरला दुखापतीमुळे ब्रेक लागला आहे.

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात हार्दिकने स्वत:च्या गोलंदाजीवर फलंदाजाने मारलेला फटका थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याचा तोल सुटला व उजवा पाय मुरगळला. त्यामुळे त्याला घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्धची आगामी ट्वेंटी-२० मालिका आणि दक्षिण आफ्रिकेतील तीन ट्वेंटी-२० व तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतून बाहेर बसावे लागणार आहे. हार्दिकची दुखापत ही भारतासाठी धक्का आहे, कारण फलंदाजी व गोलंदाजीत त्याचे महत्त्वाचे योगदान असते.

हार्दिकची दुखापत ही भारताच्या ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या तयारीत अडथळा निर्माण करणारी ठरू शकते. रोहित शर्मा व विराट कोहली हे अनुभवी खेळाडू ट्वेंटी-२० क्रिकेटपासून दूर आहेत आणि त्यांचे वय पाहता २०२४चा वर्ल्डकप ते खेळतील याची शक्यता कमी आहे. बीसीसीआय हार्दिककडे ट्वेंटी-२० संघाचा कर्णधार म्हणून पाहतेय, पण त्यासाठीच्या तयारीच्या ट्वेंटी-२० मालिकेस हार्दिकला मुकावे लागल्याने संघ व्यवस्थापनाची चिंता वाढली आहे. दरम्यान, हार्दिक राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत उपचाराठी दाखल होणार आहे.



**मुंबई : १८५७चे स्वातंत्र्यसेनानी नानासाहेब पेशवे यांची ८ डिसेंबर रोजी २००वी जयंती कर्जत येथील श्री नानासाहेब पेशवे स्मारक समितीच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. या उत्सवाला प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित राहावे यासाठी राज्यपाल रमेश बैस यांना आमंत्रित करण्यात आले. आमंत्रण देताना मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, समितीचे अध्यक्ष विवेक सुर्वे, सचिव रमेश मुंढे, उपाध्यक्ष शांताराम गायकर, कोषाध्यक्ष नितीन कांदळगावकर, मंगेश पालकर, सुधीर थोरात आदी उपस्थित होते.**

# संघर्षावर मात करीत श्रेयस अय्यर घडला!



**मुंबई : प्रतिनिधी**

वनडे वर्ल्डकप स्पर्धेत टीम इंडिया ज्या चौथ्या क्रमांकाच्या फलंदाजाच्या शोधात होती, तो शोध युवा स्टार श्रेयस अय्यरने संपवला. त्याने वानखेडे स्टेडियमवर शतक झळकावून १२ वर्षांपूर्वी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरवले. श्रेयसचा हा प्रवास सोपा नव्हता. त्यात खांद्याच्या दुखापतीने त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटला मुकावे लागलेले. आधीच संघात उशिरा पदार्पणाची संधी मिळाली, त्यात दुखापतीने नजर लावली. संघर्ष हा त्याच्या सोबतच प्रवास करताना दिसला, परंतु तरीही तो खचला नाही.

घरची परिस्थिती चांगली असली तरी संघर्ष कुणाला चुकलेला नाही. २०१८मध्येच त्याचे कसोटी संघात पदार्पण झाले असते, परंतु काही परिस्थितीमुळे त्यासाठी डिसेंबर २०२१ उजाडावे लागले. २०१९मध्येही चौथ्या क्रमांकासाठी त्याची चर्चा होतीच, परंतु तेथेही माशी शिंकली. त्यात मागील दोन वर्षे तो दुखापतीमुळे मैदानाबाहेर आहे. आंतरराष्ट्रीय सामने सोडाच, तर आयपीएलमध्येही खेळला नव्हता. अशा परिस्थितीत वर्ल्डकपसाठी त्याची निवड ही जोखीमच होती.

पहिल्या दोन सामन्यांत अपयशी ठरलेल्या श्रेयसवर टीकाही झाली, पण राहुल द्रविड, रोहित शर्मा यांनी त्याच्यावर विश्वास दाखवला. कोण काय बोलतंय याकडे तू दुर्लक्ष कर, आम्ही तुझ्या पाठीशी आहोत हे त्यांनी श्रेयसला सांगितले आणि त्याचा ग्राफ उंचावला. २००३मध्ये त्याचे वडील संतोष यांनी त्याला शिवाजी पार्क जिमखान्यात नेले. प्रवीण आम्रे, पद्माकर शिवलकर आणि संदेश कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली तो शिकला. श्रेयसमधील स्पार्क या तिघांनी ओळखला.

तेव्हाही श्रेयस उशिरा आलेला आणि तोपर्यंत २५ खेळाडूंची निवड निवड झाली होती. त्याच्या नशिबी प्रतीक्षा तेव्हाही लिहिली होतीच, पण तो प्रयत्न करत राहिला आणि त्याच्यातील प्रगती पाहून आम्रे इम्प्रेस झाले. २०१३-१४मध्ये त्याच्याकडे मुंबईच्या १९ वर्षांखालील संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आणि विनोद राघवन यांना ते श्रेय जाते. त्यात २०१४मध्ये आम्रे मुंबई संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदावर आले आणि श्रेयसच्या फेव्हरमध्ये हे घडले, पण स्थानिक क्रिकेटमध्ये तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या श्रेयसला रणजी करंडक स्पर्धेतील पहिल्या तीन सामन्यांत सातव्या क्रमांकावर खेळावे लागले.

२०१४-१५च्या पर्वात बंगालविरुद्धच्या महत्त्वाच्या लढतीत आम्रे तिसऱ्या क्रमांकावरील फलंदाजाच्या शोधात होते. तेव्हा आम्रेंनी श्रेयसला विचारले. त्यावर 'सर तुम्ही सांगाल त्या क्रमांकावर मी खेळेन' असे त्वरित म्हटले. हे आव्हान स्वीकारल्यावर त्याने १७५ चेंडूंत १५३ धावांची खेळी केली. तिथून खऱ्या अर्थाने श्रेयसचा स्पार्क दिसला..

आम्रे यांच्या सल्ल्यानंतरच श्रेयस अभिषेक नायर यांच्याकडे गेला आणि श्रेयसला दिशा मिळाली. फिटनेसवर श्रेयसने काम करण्यास सुरुवात केले. मेडिटेशन व दैनंदिन व्यायाम सुरू झाला आणि तीन वर्षांची मेहनत कामी आली. २०१५मध्ये दिल्ली डेअरडेव्हिल्सने २.६ कोटींत त्याला ताफ्यात घेतले. तीन ट्वेंटी-२० सामन्यांचा अनुभव गाठीशी असलेल्या युवा खेळाडूसाठी ही खूप मोठी रक्कम व संधी होती. त्यानेही संधीचं सोनं करताना ४३९ धावा चोपल्या आणि आयपीएलच्या त्या पर्वातील तो मोस्ट प्रॉमिसिंग स्टार ठरला.

मार्च २०१७मध्ये विराट कोहलीला बॅक अप म्हणून श्रेयसला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटीत निवडले गेले होते. त्याचवर्षी ट्वेंटी-२० व वनडे संघात त्याचे पदार्पण झाले, पण यश काही सहज त्याच्या वाट्याला आले नाही. २०२०मध्ये दिल्ली डेअरडेव्हिल्सने त्याच्याकडे कर्णधारपद सोपवले. २०२१मध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी पदार्पणात त्याने शतक झळकावले. पदार्पणात शतक झळकावणारा तो सोळावा भारतीय कसोटी फलंदाज ठरला. सर्व सुरळीत होईल असे वाटत असताना पाठदुखीने अय्यरला ग्रासले. त्याला संघाबाहेर जावे लागले आणि तिथून तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत पुनर्वसनासाठी दाखल झाला. प्रचंड मेहनत घेऊन त्याने टीम इंडियात कमबॅक केले अन् आज त्याने टीकाकारांना गप्प केलेय. वर्ल्डकप स्पर्धा इतिहासातील भारताचा तो चौथ्या क्रमांकाचा सर्वात यशस्वी फलंदाज ठरला आहे.

## चौथ्या क्रमांकाच्या फलंदाजाचा शोध संपला

२०१९च्या वर्ल्डकपमध्ये चौथ्या क्रमांकावर भारताने चार फलंदाज खेळवले आणि त्यांना मिळून २८.७च्या सरासरीने २५९ धावा करता आल्या होत्या, पण श्रेयसने या वर्ल्डकपमध्ये एकट्याने ५२६ धावा कुटल्या आहेत आणि त्याही ७५.१४च्या सरासरीने. वानखेडेवर त्याने वर्ल्डकपमधील भारताकडून तिसरे जलद शतक झळकावले, पण विराटच्या पन्नासाव्या ऐतिहासिक शतकामुळे अय्यरला विजयाचे हवे तेवढे श्रेय मिळाले नाही.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com